




दैनिक

# युवावार्ता

परिवर्तनाचा पुरस्कर्ता

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264 ◆ RNI No. MAHMAR/2007/24252 ◆ पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25









वर्ष १९ वे । अहिल्यानगर । अंक ८५ । किंमत - ४ रू । संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) बुधवार । ०८/०४/२०२६ । पान - ६







## संगमनेरात पुन्हा अवैध कत्तलखान्याचा पर्दाफाश

### एलसीबीची धडक कारवाई, ८.६८ लाखांचा मुद्देमाल जप्त



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - शहरात अवैध कत्तलखाने बंद असल्याचा पोलिसांचा वारंवार दावा फोल ठरत असून, प्रत्यक्षात हे कत्तलखाने पुन्हा पुन्हा सुरू असल्याचे धक्कादायक वास्तव समोर येत आहे. पोलिस प्रशासनाकडून कडक कारवाईचे आश्वासन दिले जात असतानाही, प्रत्यक्षात हप्तेखोरीच्या आरोपांमुळे स्थानिक पोलिसांची भूमिका संशयाच्या भोवऱ्यात सापडली आहे.

याच पार्श्वभूमीवर स्थानिक गुन्हे शाखा (एलसीबी) पथकाने संगमनेर शहरातील भारतनगर परिसरात अचानक छापा टाकत मोठी कारवाई केली. या कारवाईत तब्बल ८ लाख ६८ हजार रुपये किमतीचे गोवंश मांस आणि विविध साहित्य जप्त करण्यात आले. या धाडसी कारवाईमुळे स्थानिक पोलिसांच्या कामकाजावर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

एलसीबी पथकाला गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, भारतनगर येथे अजमत लतिफ कुरेशी व त्याचे साथीदार घराजवळ पत्र्याच्या आडोशाला गोवंशाची कत्तल करत आहेत. माहिती मिळताच पथकाने तात्काळ घटनास्थळी धाड टाकली. छाप्यावेळी आरोपी एका छोट्या टेम्पोमध्ये कत्तल केलेले गोमांस भरत असताना आढळून आले. मात्र पोलिसांची चाहूल लागताच काही आरोपी अंधाराचा फायदा घेत गल्लीबोळातून फरार झाले.

या कारवाईदरम्यान पोलिसांनी तिघांना ताब्यात घेतले असून त्यांची नावे पुढीलप्रमाणे निजम अय्याज कुरेशी (वय २१, रा. मदिनानगर), निसार रहेमान कुरेशी (वय ३०, रा. मदिनानगर), मोसीन असलम कुरेशी (वय २५, रा. कादरीनगर) तर पुढील आरोपी फरार झाले आहेत यात अजमत लतिफ कुरेशी (भारतनगर), कासिफ अनवर कुरेशी (मदिनानगर) यांचा समावेश आहे.

या कारू पोलिसांनी आरोपींकडून खालील मुद्देमाल जप्त केला आहे. १,०५० किलो गोमांस (किंमत: ३,१५,०००), पिकअप वाहन (५,५०,०००), दोन लोखंडी टोचे, चार चाकू, तीन काणस, इलेक्ट्रिक वजन काटा, असा एकूण मुद्देमाल किंमत: ८,६८,००० या प्रकरणी संगमनेर शहर पोलीस ठाण्यात गु.र.नं. २७१/२०२६ अंतर्गत भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम २७१, ३२५, ३(५) तसेच प्राणी संरक्षण अधिनियमातील विविध कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

एलसीबीच्या या कारवाईमुळे संगमनेर शहर पोलिसांच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. वरिष्ठ अधिकाऱ्यांची उपस्थिती असूनही अशा प्रकारचे अवैध धंदे सुरू राहणे, हे स्थानिक पातळीवरील निष्काळजीपणा किंवा संगनमत असल्याची चर्चा नागरिकांमध्ये रंगू लागली आहे.

स्थानिक नागरिकांकडून आता ठोस आणि सातत्यपूर्ण कारवाईची अपेक्षा व्यक्त केली जात असून, कत्तलखाने कायमस्वरूपी बंद होणार का? हा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

## संगमनेरमध्ये उपचारात निष्काळजीपणा ?

### रुग्णाच्या मृत्यूबाबत पत्नीची तक्रार




युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर शहरातील एका नामांकित खासगी रुग्णालयात उपचारादरम्यान काही त्रुटी किंवा निष्काळजीपणा झाला का, असा प्रश्न उपस्थित करणारी घटना समोर आली आहे. या प्रकरणी मयत रुग्णाच्या पत्नीने संगमनेर शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून, न्यायालयाच्या आदेशानुसार पुढील तपास सुरू आहे.

तक्रारदार सौ. मंगल दत्तात्रय दळवी (वय ४४, रा. पिंपळगाव निपाणी, ता. अकोले, जि. अहमदनगर) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, त्यांचे पती दत्तात्रय दळवी हे शेती व्यवसाय करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करत होते. त्यांना अचानक छातीत दुखू लागल्याने दि. २७ फेब्रुवारी २०२५ रोजी संगमनेर येथील रुग्णालयात तपासणीसाठी दाखल करण्यात आले. सुरुवातीच्या तपासण्यांमध्ये रक्तातील विविध घटक, क्रिएटिनिन आदी सर्व अहवाल सामान्य असल्याचे सांगण्यात आले. त्यानंतर दि. २८ फेब्रुवारी रोजी हृदयाशी संबंधित पुढील तपासण्या करून अँजिओप्लास्टी व स्टेंट बसवण्याचा सल्ला देण्यात आला. तक्रारदारांच्या म्हणण्यानुसार, डॉक्टरांनी दिलेल्या सल्ल्यावर विश्वास ठेवून त्यांनी उपचारास संमती दिली.

दि. १ मार्च रोजी रुग्णावर स्टेंट बसवण्याची प्रक्रिया करण्यात आली. मात्र त्यानंतर रुग्णाच्या प्रकृतीत अचानक बिघाड झाल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. स्टेंट बसवलेल्या ठिकाणी हाताला सूज येणे, तसेच पुढील तपासणीत किडनीशी संबंधित क्रिएटिनिनचे प्रमाण वाढल्याचे निदर्शनास आल्याचे सांगण्यात आले. तक्रारीनुसार, या गंभीर (पान २ वर)

## अमेरिका-इराण तणाव टोकाला

### मानवी साखळीने प्रकल्पांचे संरक्षण



नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणच्या ऊर्जा प्रकल्पांवर आणि ब्रिजवर मंगळवारी रात्री ८ वाजता मोठा हल्ला केला जाईल म्हटले. इराणला पाषाण युगात पाठवायचे असल्याचेही त्यांनी म्हटले. भारतीय वेळेनुसार, बुधवारी ३.३० वाजता अमेरिका इराणवर घातक हल्ला करणार आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी करार करण्याकरिता इराणला ४८ तासाचा वेळ दिला. तो वेळ मंगळवारी रात्री ८ वाजता संपणार आहे. त्यानंतर इराणच्या ऊर्जा प्रकल्पांवर हल्ले केले जाणार आहेत. मात्र, डोनाल्ड ट्रम्प यांच्या मोठ्या धमकीनंतरही इराण माघार घेत नाही. यादरम्यानच डोनाल्ड ट्रम्प यांचा डाव उलटून टाकण्यासाठी इराणकडून मास्टर प्लॅन तयार करण्यात आला. इराण सरकारकडून आपल्या जनतेला मोठे आवाहन करण्यात आले. इराण सरकारने आपल्या देशातील युवकांना ऊर्जा प्रकल्पांभोवती मानवी साखळी करून उभे राहण्याचे आवाहन केले. ऊर्जा प्रकल्पांच्या चारही बाजूने मानवी साखळी तयार करून उभे राहा, असे म्हटले. इराणच्या क्रिडा मंत्रालयाने खेळाडू, कलाकार आणि विद्यार्थ्यांना मोठे आवाहन केले. क्रीडा मंत्रालयाने म्हटले की, मंगळवारी दुपारी २ वाजता सर्वांनी ऊर्जा प्रकल्पांजवळ जमावे. यावेळी खेळाडू, कलाकार आणि देशातील तरूण निषेध देखील करतील. मानवी साखळी तयार करून त्यांच्याकडून आपल्या देशाच्या ऊर्जा प्रकल्पांचे संरक्षण केले जाईल.अमेरिकेकडून इराणमधील ब्रिज आणि ऊर्जा प्रकल्पांवर हल्ला केला जाईल, अशी धमकी देण्यात आली. मात्र, तरीही इराण मागे हटत नाही. करार स्विकारण्यापेक्षा इराणकडून प्लॅन बी तयार करण्यात आला. म्हणजेच थोडक्यात काय तर अमेरिकेच्या धमकीनंतरही इराण होर्मुज खाडी खुली करणार नाही किंवा करारही करणार नाही. युद्ध थांबवण्याकरिता इराणच्या काही प्रमुख मागण्या आहेत.

## घुलेवाडीत कोट्यवधींच्या योजना... तरीही पाण्यासाठी वणवण




युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - तालुक्यातील घुलेवाडी गावाचा झालेला विकास राज्यभर गाजत असला, तरी प्रत्यक्षात गावकऱ्यांना आजही पिण्याच्या पाण्यासाठी संघर्ष करावा लागत असल्याची गंभीर बाब समोर आली आहे. कोट्यवधी रुपयांच्या योजना राबवूनही नळातून पाणी नियमित येत नसल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

माहितीनुसार, मागील सहा वर्षांत गावासाठी सुमारे २२ कोटी रुपयांचा निधी खर्च करण्यात आला. त्यानंतर जलजीवन मिशन अंतर्गत जवळपास १२० कोटी रुपयांची भव्य पाणीपुरवठा योजना मंजूर करण्यात आली. एवढा मोठा निधी खर्च होऊनही घुलेवाडीकरांना दररोज किंवा किमान दिवसाआडही पाणी मिळत नसल्याने हा नेमका कोणता विकास? असा सवाल ग्रामस्थ उपस्थित करत आहेत.

गावातील नागरिकांचा आरोप आहे की, निवडणुकीच्या काळात मोठमोठी आश्वासने देणारे नेते आणि त्यांचे कार्यकर्ते आता गायब झाले आहेत. गाव किरकोळ कारणांवर बंद पाडणारे, आंदोलन करणारे लोक पाणी प्रश्नावर मात्र मौन बाळगत असल्याने संताप अधिक वाढला आहे.

विशेष म्हणजे, ग्रामपंचायतीतील सुशिक्षित पदाधिकारी असूनही मागील तीन वर्षांत पाणीटंचाईचा कायमस्वरूपी तोडगा निघू शकलेला नाही. नळजोडणी व दुरुस्तीच्या नावाखाली लाखो रुपयांची उधळपट्टी होत असल्याचा आरोपही ग्रामस्थांकडून केला जात आहे. पाणीपट्टी वेळेवर न भरल्यास दंड आकारला जातो, पण पाणी वेळेवर देण्याची जबाबदारी कोण घेणार? असा सवालही नागरिक विचारत आहेत.

गावात ३०-४० वर्षांपासून पाण्याची समस्या कायम आहे. इतर संस्थांमध्ये वेळेवर पाणीपुरवठा होत असताना, घुलेवाडीमध्ये मात्र टंचाई का, असा प्रश्नही उपस्थित केला जात आहे. पाणीपुरवठ्याचे ठोस वेळापत्रक आहे का? असल्यास ते पाळले जाते का? याबाबतही ग्रामपंचायतीकडून स्पष्ट उत्तर मिळत नसल्याची तक्रार आहे. राजकीय स्तरावरही आरोप-प्रत्यारोप सुरू आहेत. ग्रामपंचायत अनेक वर्षे एकाच राजकीय गटाच्या ताब्यात असूनही मूलभूत समस्या न सुटल्याने ग्रामस्थ नाराज आहेत. विकासाच्या नावाखाली काहींचीच प्रगती झाली, गाव मात्र आहे तिथेच, अशी बोचरी टीकाही नागरिक करत आहेत. दरम्यान, गावात अनेक युवा नेते पुढे येत असले तरी प्रत्यक्षात काम करणारे कोणी दिसत नाही, अशी भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे. सोशल मीडियावर प्रसिद्धी मिळवणाऱ्या नेत्यांपेक्षा पाणी प्रश्न सोडवणारा खरा नेता हवा, अशी मागणी आता जोर धरत आहे. सध्या परिस्थिती अशी आहे की, नागरिकांचा संयम सुटू लागला असून संताप उफाळून येत आहे. वेळेत पाणीपुरवठा न झाल्यास मोठे आंदोलन उभे राहण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

ग्रामपंचायतीने तात्काळ ठोस पावले उचलून पाणीप्रश्न कायमस्वरूपी मार्गी लावावा, अन्यथा नागरिकांच्या रोषाला सामोरे जावे लागेल, असा इशारा ग्रामस्थांकडून देण्यात आला आहे.

संगमनेर शहरालगत गाव असल्याने घुलेवाडीत मोठ्या प्रमाणावर नागरीकरण झाले आहे. घुलेवाडीत अनेक मोठमोठ्या वसाहती निर्माण झाल्या आहेत. सातत्याने यामध्ये वाढच होत आहे. त्यामुळे पाणी, रस्ते यासह नागरीकरणाचे प्रश्न वाढत आहे. दरम्यान घुलेवाडी हद्दीत राहणाऱ्या नागरीकांचे नावे घुलेवाडी मतदार संघात नाहीत. त्यामुळे निश्चित लोकसंख्या दिसत नसल्याने देखील विकास कामावर याचे परिणाम होत आहे.










# पीएनजी' क्षेत्रातील नागरिकांना ३० जूननंतर 'एलपीजी' गॅस पुरवठा बंद




मुंबई (वृत्तसंस्था)

राज्यातील ज्या शहरी भागांमध्ये पाइपद्वारे गॅस (पीएनजी) जोडणीची सुविधा उपलब्ध आहे, तिथे नागरिकांनी पीएनजी जोडणीसाठी येत्या ३० जूनपर्यंत अर्ज किंवा नोंदणी करणे बंधनकारक आहे. पीएनजी वाहिनी कार्यान्वित असूनही नागरिक अर्ज करत नसल्यास, त्या भागातील घरगुती गॅस (एलपीजी) सिलिंडरचा पुरवठा ३० जूननंतर बंद केला जाईल, असा इशारा राज्य सरकारच्या वतीने देण्यात आला आहे. घरगुती आणि व्यावसायिक अशा दोन्ही प्रकारच्या वापरकर्त्यांसाठी हे बंधनकारक असल्याचे नियंत्रक शिधावाटप चंद्रकांत डांगे यांनी सोमवारी स्पष्ट केले.

राज्यातील तेल उत्पादनांच्या पुरवठ्याबाबत माहिती देण्यासाठी मंत्रालयातील पत्रकार कक्षात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव अनिल डिग्गीकर, उमेश कुलकर्णी (राज्य समन्वयक, तेल उद्योग) आदी उपस्थित होते. आखाती देशांतील युद्धजन्य परिस्थितीमुळे पुरवठा साखळीवर ताण असला, तरी राज्यात पेट्रोल आणि डिझेलचा साठा मुबलक आहे. इंधन टंचाईमुळे लॉकडाऊन लागणार असल्याच्या अफवा पसरल्याने मागील आठवड्यात रांगा लागल्या होत्या, मात्र आता परिस्थिती पूर्णपणे नियंत्रणात आहे, असे डांगे यांनी सांगितले. सध्या दररोज १८ हजार ५०० किलोलीटर पेट्रोल आणि ४० हजार किलोलीटर डिझेलचे वितरण सुरू असून मागणी सरासरी इतकीच आहे, अशी माहिती त्यांनी दिली. वाढत्या मागणीला पर्याय म्हणून पीएनजी नेटवर्क गतीने वाढवण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. यासाठी प्रलंबित अर्जांना २७ मार्च रोजी डीम्ड परवानगी' देण्यात आली असून महानगरपालिकांना २४ तासांच्या आत मंजुरी देण्याचे आदेश दिले आहेत.

# एरंडेच्या कार्यालयातून सापाची कातडी-पक्ष्यांचे अवयव जप्त

## खरात प्रमाणेच दिल्या 'नाशिक जिल्हा, कायद्याचा बालेकिल्ला'च्या घोषणा

युवावार्ता (प्रतिनिधी)

नाशिक - स्वतःला पत्रकार आणि कन्सल्टंट म्हणवून घेणाऱ्या रवींद्र नारायण एरंडे (६३) याच्या लैंगिक शोषण आणि फसवणुकीच्या प्रकरणाने नाशिकमध्ये मोठी खळबळ उडवून दिली असून, पीडित महिलांच्या तक्रारींनंतर त्याच्या पोलिस कोठडीत १० एप्रिलपर्यंत वाढ करण्यात आली आहे. तपासादरम्यान पोलिसांनी एरंडेच्या कार्यालयातून सापाची कात आणि पक्ष्यांचे अवयव जप्त केल्याने, सुशिक्षित आणि प्रतिष्ठित मुखवटा ओढलेल्या या नराधमाचा भोंदूगिरीचा काळा चेहराही आता समोर आला आहे. दरम्यान, न्यायालयातून बाहेर पडल्यावर अशोक खरातप्रमाणेच 'नाशिक जिल्हा, कायद्याचा बालेकिल्ला'च्या घोषणा दिल्याने सर्वांच्या भुवया उंचावल्या आहेत.

अशोक खरातच्या प्रकरणाप्रमाणेच रवींद्र एरंडेने देखील महिलांना विविध आमिषे दाखवून भोंदूगिरी केल्याचे तपासात निष्पन्न होत आहे. सातपूर येथील त्याच्या कार्यालयाची झडती घेतली असता, तेथे सापाची कात, पक्ष्यांचे अवयव आणि कवडी यांसारख्या संशयास्पद वस्तू आढळल्याने खळबळ उडाली आहे. या वस्तूंचा वापर तो महिलांना वश करण्यासाठी किंवा त्यांना भीती घालण्यासाठी करत असावा असा संशय पोलिसांना असून त्यादृष्टीने कसून तपास सुरू आहे. तसेच पोलिसांनी त्याच्या कार्यालयातून आर्थिक व्यवहारांशी संबंधित महत्त्वाची कागदपत्रेही जप्त केली आहेत.




तपासादरम्यान एरंडेच्या जाळ्यात अडकलेल्या ८ महिलांची ओळख पटली असून, पोलिसांनी आवाहन केल्यानंतर अनेक पीडितांनी धैर्याने पुढे येत आपली कैफियत मांडली आहे. नोकरीचे आमिष दाखवून किंवा विविध प्रकारे फसवणूक करून या महिलांची शारीरिक आणि मानसिक पिळवणूक केल्याचे प्राथमिक तपासात स्पष्ट झाले आहे. पोलिस सध्या या महिलांची गोपनीयता राखून त्यांचे प्रबोधन करत आहेत, तसेच त्यांच्या तक्रारी रीतसर नोंदवून घेण्याची कायदेशीर प्रक्रिया अत्यंत संवेदनशीलतेने राबवली जात आहे.

सोमवारी (६ एप्रिल) पोलिस कोठडीची मुदत संपल्यानंतर सहायक पोलिस आयुक्त डॉ. सचिन बारी यांनी न्यायालयाला तपासातील प्रगतीबाबत सविस्तर माहिती दिली, ज्याची दखल घेत न्यायालयाने गुन्ह्याचे गांभीर्य ओळखून रवींद्र एरंडेच्या कोठडीत १० एप्रिलपर्यंत वाढ केली आहे. विशेष म्हणजे, न्यायालयातून बाहेर पडताना आपली ओळख लपवण्यासाठी चेहरा झाकून घेतलेल्या एरंडेने नाशिक जिल्हा, कायद्याचा बालेकिल्ला अशी घोषणाबाजी केल्याने उपस्थितांमध्ये आश्चर्य व्यक्त होत होते. या प्रकरणातील भोंदूगिरी आणि लैंगिक शोषणाचे धागेदोरे आता अधिक खोलवर तपासले जात आहेत.

# संगमनेरमध्ये महिला नेतृत्वाविरोधात घाणेरडा अपप्रचार; भाजपचा इशारा

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर -भारतीय जनता पार्टीच्या संगमनेर शहरातील कामकाजाबाबत जाणीवपूर्वक खोट्या, दिशाभूल करणाऱ्या आणि तथ्यहीन बातम्या पसरवून पक्षाची प्रतिमा मलिन करण्याचा घाणेरडा प्रयत्न पक्षातीलच काही जणांकडून सुरू असल्याचा गंभीर आरोप भाजपा शहर सरचिटणीस भारत गवळी यांनी केला आहे. पक्षशिस्तीसाठी व पक्षाला बाधा पोहचेल असे वर्तन या प्रकारामागील व्यक्तींनी तात्काळ थांबावे, अन्यथा कठोर संघटनात्मक कारवाईला सामोरे जावे लागेल, असा थेट इशारा भारत गवळी यांनी दिला आहे.



संगमनेर शहराध्यक्षपदी सौ. पायल ताजणे यांची निवड झाल्यापासून काही विघ्नसंतोषी आणि स्वार्थी प्रवृत्तीच्या लोकांना महिला नेतृत्व खटकत असल्याचे स्पष्ट दिसत आहे. मात्र, पालकमंत्री ना. विखे व पायलताई ताजणे यांच्या ठाम, सक्षम आणि परिणामकारक नेतृत्वाखाली पक्षाचे काम अत्यंत सुरळीत, शिस्तबद्ध आणि प्रभावीपणे सुरू आहे, ही वस्तुस्थिती कुणीही नाकारू शकत नाही.

भारतीय जनता पार्टी हा महिलांना सर्वोच्च सन्मान आणि स्थान देणारा पक्ष आहे. देशाच्या सर्वोच्च पदावर महिला विराजमान असणे हीच भाजपा विचारसरणीची ताकद आणि बांधिलकी दर्शवणारी बाब आहे. त्यामुळे महिलांच्या नेतृत्वावर प्रश्न उपस्थित करणे हा केवळ पक्षविरोधी नव्हे, तर महिला सन्मानाला धक्का देणारा निंदनीय प्रकार आहे.

काही जणांकडून जाणीवपूर्वक अपप्रचार करून पक्षात अंतर्गत वाद असल्याचे खोटे चित्र रंगवणाऱ्यांनी आपली मर्यादा ओळखावी. अशा बेजबाबदार आणि कृतघ्न वर्तनाला भाजपा कधीही सहन करणार नाही. संबंधितांनी तात्काळ खुलासा करावा, अन्यथा त्यांच्यावर कठोर आणि ठोस कारवाई अपरिहार्य राहील असेही गवळी यांनी ठामपणे सांगितले.

संगमनेरमधील भाजपा कार्यकर्ते व पदाधिकारी एकदिलाने आणि एकजुटीने पक्षाच्या विकासात्मक कार्यात कार्यरत असून, अशा अफवांमुळे पक्षाच्या कामावर तसूभरही परिणाम होणार नाही. मात्र पक्षांतर्गत बंडाळी करणारे नक्कीच उघडे पडतील. उलट, अशा खोट्या प्रचाराला जनता योग्य वेळी चोख उत्तर देईल, असा विश्वास देखील गवळी यांनी व्यक्त केला.

## पान १ वरून - संगमनेरमध्ये उपचारात ...

परिस्थितीत संबंधित तज्ज्ञ डॉक्टर (युरोलॉजिस्ट/नेफ्रोलॉजिस्ट) यांचा सल्ला वेळेवर घेण्यात आला नाही, तसेच अँजिओप्लास्टीपूर्वी आवश्यक त्या सर्व बाबींचा योग्य विचार झाला का, याबाबतही प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे. पुढील दिवशी डॉक्टरांनी पुन्हा रक्ततपासणी करून क्रिएटिनिनचे प्रमाण वाढल्याची माहिती दिली. त्यानंतर रुग्णाच्या प्रकृतीत अधिकच बिघाड होत असल्याचे लक्षात आल्यानंतर आर्थिक बाबींचाही उल्लेख करत पुढील उपचारासाठी हलविण्याचा सल्ला देण्यात आल्याचे तक्रारीत नमूद आहे. या दरम्यान तातडीच्या उपचारासाठी काही कागदपत्रांवर स्वाक्षऱ्या घेण्यात आल्याचाही आरोप करण्यात आला आहे. रुग्णाची प्रकृती अधिक गंभीर झाल्यानंतर त्यांना नाशिक येथील नाईन प्लस हॉस्पिटलमध्ये हलविण्यात आले. तेथे पुढील उपचारादरम्यान महात्मा फुले जनआरोग्य योजनेअंतर्गत लाभ मिळणार का, याबाबतही तपासणी करण्यात आली. मात्र, अखेरीस दि. २२ मार्च २०२५ रोजी उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.

तक्रारदार महिलेच्या म्हणण्यानुसार, उपचार प्रक्रियेदरम्यान झालेल्या निष्काळजीपणामुळे रुग्णाची प्रकृती किडनी फेल्युअरपर्यंत बिघडली असावी, असा संशय व्यक्त करण्यात आला आहे. दरम्यान, या प्रकरणी संबंधित डॉक्टरांविरुद्ध संगमनेर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, प्रत्यक्षात उपचारातील निष्काळजीपणा होता की वैद्यकीय गुंतागुंत, याबाबत तपास यंत्रणांकडून सखोल चौकशी सुरू आहे. या घटनेमुळे शहरात चर्चा रंगल्या असून, अंतिम निष्कर्ष तपासाअंती स्पष्ट होणार आहे. या प्रकरणी डॉ. अभिजीत भाऊसाहेब कोरडे आणि डॉ. अजिंक्य अशोक सोनांबेकर यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# पोलिस ठाण्यातून वाहने घेवून जा, अकोले पोलीस

अकोले (प्रतिनिधी)

अकोले पोलीस ठाण्याच्या आवारात मागील काही वर्षांपासून विविध कंपन्यांची दुचाकी, चारचाकी व ट्रकसारखी वाहने अभिलेखावरिल गुन्ह्यांतील तसेच बेवारस जप्त पडून आहेत. सदर वाहने कागदपत्रे दाखवून पुढील सात दिवसांत घेवून जाण्याचे आवाहन करण्यात आले आहे. सदर वाहने ताब्यात घेण्यासाठी अद्यापपर्यंत कोणीही मालक आलेले नाही. तरी ज्या नागरिकांची ही वाहने आहेत त्यांनी वाहनाचे नोंदणी दस्तऐवज (कागदपत्र) समक्ष दाखवून संपर्क साधावा. त्याबाबत अधिकृत खात्री करुन व नोंदणी पडताळणी याची पुढील सात दिवसांत खात्री करुन घेवून जावे. याबाबत दिलेल्या ७ दिवसांच्या मुदतीत आपले वाहन खात्री करुन घेवून न गेल्यास त्याचा नियमाप्रमाणे लिलाव करुन पुढील कायदेशीर प्रक्रिया करण्यात येईल, असे पो-लीस निरीक्षक मोहन बोरसे यांनी स्पष्ट केले आहे.

# स्वत:ची लायकी स्वत:च तपासा: परफॉर्मन्स रिव्ह्यू !



एक लहान मुलगा एका दुकानात शिरला. तिथे असलेल्या टेलिफोनपर्यंत त्याचा हात पुरत नव्हता. त्याने शक्कल लढवली, कोल्ड्रिंकचा एक रिकामा बॉक्स ओढत फोनजवळ आणला. त्यावर चढला आणि खिशातून सुट्टे पैसे काढून त्याने एक नंबर फिरवला. दुकानदार काउंटरवरून हे सगळं शांतपणे पाहत होता आणि मुलाचं बोलणं ऐकत होता. मुलगा: हॅलो मॅडम, तुमच्या घरच्या बागेतील गवत कापण्याचं (लॉन मेंटेन करण्याचं) काम मला द्याल का ? मॅडम (फोनच्या पलीकडून): अरे बाळा, नको. माझ्याकडे आधीच एक मुलगा हे काम करतोय. मुलगा (एका सराईत सेल्समनसारखी ऑफर देत): मॅडम, तो जेवढे पैसे घेतो ना, त्याच्या निम्म्या पैशात मी तुमची बाग चकाचक करून देईन ! मॅडम: नाही रे बाळा, सध्या जो मुलगा काम करतोय, त्याच्या कामावर मी अत्यंत खूश आहे. मला तो बदलायचा नाही. मुलगा (शेवटचा हुकमी एक्का टाकत): मॅडम, मी फक्त गवतच नाही कापणार, तर तुमच्या घरापुढचा रस्ता आणि फूटपाथ पण मोफत झाडून देईन. रविवारी तुमची बाग या पूर्ण शहरात सर्वात सुंदर दिसेल, याची गॅरंटी माझी ! मॅडम: तुझी ऑफर खूप छान आहे, पण नको. धन्यवाद ! मुलाने चेहऱ्यावर एक मोठं, विजयी हास्य आणत फोन खाली ठेवला. हे सगळं ऐकणारा दुकानदार मुलाजवळ आला. मुलाची जिद्द पाहून तो इम्प्रेस झाला होता.

दुकानदार म्हणाला: बेटा, मला तुझा हा नेव्हर गिव्ह अप ॲटिट्यूड खूप आवडला. ती बाई तुला काम देत नसेल तर नको देऊ दे, तू माझ्या दुकानात कामाला राहा. मी देतो तुला काम ! मुलगा हसून म्हणाला: नाही काका, धन्यवाद! मला कामाची अजिबात गरज नाही.

दुकानदार चक्रावला: अरे वेड्या, मगाशी तर तू त्या बाईसमोर कामासाठी अक्षरशः गयावया करत होतास, आणि आता म्हणतोस काम नको ? मुलगा (कॉलर टाईट करत म्हणाला): काका, मी नोकरी मागत नव्हतो... मी तर माझा परफॉर्मन्स रिव्ह्यू' घेत होतो ! कारण त्या मॅडमच्या बागेत सध्या जो मुलगा काम करतोय ना... तो मीच आहे !

जीवनाचे सखोल धड -

१.दुसऱ्यांच्या सर्टिफिकेट ची वाट पाहू नका: आपण अनेकदा बॉस, समाज किंवा घरच्यांकडून शाबासकी मिळण्याची वाट पाहत बसतो. पण खऱ्या विजेत्याला दुसऱ्यांच्या सर्टिफिकेटची गरज नसते. तो स्वतःच स्वतःचा सर्वात कडक ऑडिटर असतो!

२. तुमचं काम रिप्लेस करण्यासारखं आहे का ? त्या बाईला निम्म्या पैशात आणि एक्स्ट्रा काम करणारा पर्याय मिळत होता, तरीही तिने नकार दिला. का ? कारण सध्याच्या मुलाच्या कामाच्या दर्जावर तिचा अफाट विश्वास होता. जगात कोणतीही मंदी आली, तरी क्वालिटी देणाऱ्या माणसाला कधीच मरण नसतं !

३.खरा फीडबॅक घेण्याची हिंमत: आपण स्वतःला कितीही भारी समजत असू, पण समोरच्याच्या नजरेत आपली खरी किंमत काय आहे, हे पडताळून पाहण्याची हिंमत फार कमी लोकांत असते. या मुलाने कोणतीही ओळख न सांगता आपला अत्यंत निःपक्षपाती फीडबॅक मिळवला.

सारांश - यालाच कॉर्पोरेट भाषेत Selff Appraisal (स्व-मूल्यांकन) म्हणतात ! आयुष्य ही एक सतत चालणारी परीक्षा आहे. लोक तुमच्या पाठीमागे तुमच्या कामाबद्दल काय बोलतात, हेच तुमचं खरं यश असतं. जेव्हा तुम्ही स्वतःच्याच कामावर शंका घेऊन एक त्रयस्थ व्यक्ती म्हणून स्वतःला प्रश्न विचारता, तेव्हा तुम्हाला तुमच्यातील खऱ्या त्रुटी आणि खरी ताकद समजते. म्हणून, जगाशी स्पर्धा करण्यापेक्षा स्वतःशीच स्पर्धा करा. स्वतःलाच विचारा, जर मी माझाच बॉस असतो, तर मी स्वतःला नोकरीवर ठेवलं असतं का ? जर उत्तर हो असेल, तर तुम्ही योग्य मार्गावर आहात !.

**मुकुंद वसुंधरा कृष्णराव डांगे**
**संगमनेर, मो. ७७१९९९६८६१**

# पाकिस्तानकडून आलेल्या युध्दविरामाच्या प्रस्तावाला इराणने दाखवली केराची टोपली



मुंबई (वृत्तसंस्था)

इराणने पाकिस्तानकडून मांडण्यात आलेल्या १५ मुद्द्यांच्या शांतता प्रस्तावाला नकारदिला आहे. परराष्ट्र मंत्रालयाच्या एका प्रवक्त्याने सांगितले की, मध्यस्थांमार्फत पाठवण्यात आलेला अलीकडील शांतता प्रस्ताव इराणने फेटाळून लावला आहे. युद्धविरामासंदर्भातील कोणतीही चर्चा इराणच्या राष्ट्रीय हितांचा विचार करूनच केली जाईल अशी भूमिका तेहरानने पुन्हा स्पष्ट केली आहे.

वृत्तानुसार, पाकिस्तानने तयार केलेल्या मसुदा प्रस्तावाची प्रत इराण आणि अमेरिका या दोन्ही देशांना पाठवण्यात आली होती. या प्रस्तावात युद्ध समाप्त करण्यासाठी ४५ दिवसांच्या युद्धविरामासह होर्मुज सामुद्रधुनी पुन्हा खुली करण्याचा प्रस्ताव होता. इराणच्या परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते इस्माईल बगाई यांनी सांगितले की, तेहरानने मध्यस्थांमार्फत आपली भूमिका आणि अटी यापूर्वीच स्पष्ट केल्या होत्या. कोणत्याही प्रकारच्या दबाव किंवा धमक्यांखाली इराण चर्चा करणार नाही, असे त्यांनी ठामपणे सांगितले.

इस्माईल बगाई म्हणाले, डेडलाइन देणे आणि युद्धाची धमकी देणे हे चर्चेच्या प्रक्रियेशी सुसंगत नाही. तेहरानच्या काही अटी आहेत ज्या पूर्णपणे राष्ट्रीय हितांवर आधारित आहेत आणि त्यांना कोणत्याही तडजोडीचा संकेत म्हणून पाहू नये. त्यांनी पुढे सांगितले की, इराण आपल्या योग्य आणि न्याय्य मागण्या स्पष्टपणे मांडण्यास अजिबात कचरात नाही. याकडे तडजोड म्हणून नव्हे, तर आत्मविश्वासाच्या प्रतीक म्हणून पाहिले पाहिजे.

# लॉकडाऊन काळात बाप-लेकाचा घेतला होता बळी

## ९ पोलिसांना फाशीची शिक्षा

मध्यप्रदेश (वृत्तसंस्था)

२०२० मध्ये संपूर्ण देशाला हादरवून सोडणाऱ्या तमिळनाडूतील 'कस्टोडियल डेथ' (पोलीस कोठडीतील मृत्यू) प्रकरणात अखेर मोठा निकाल लागला आहे. ५८ वर्षीय पी. जयराज आणि त्यांचा ३८ वर्षीय मुलगा बेनिक्स यांच्या मृत्यूला जबाबदार धरत न्यायालयाने ९ पोलीस अधिकाऱ्यांना फाशीची शिक्षा सुनावली आहे.

लॉकडाऊनच्या नियमांचे उल्लंघन केल्याच्या शुल्लक कारणावरून या दोघांना ताब्यात घेण्यात आले होते, त्यानंतर पोलिसांनी केलेल्या अमानुष मारहाणीत त्यांचा मृत्यू झाला होता.

कोविड-१९ महामारीच्या काळात लागू असलेल्या लॉकडाऊन नियमांचे उल्लंघन करून आपली मोबाईल शॉप उघडी ठेवल्याचा आरोप या बाप-लेकावर होता. तमिळनाडू पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतले आणि कोठडीत त्यांच्यावर अत्यंत क्रूरपणे हल्ला केला. एकमेकांसमोर त्यांना विवस्त्र करून मारहाण करण्यात आली, असे निरीक्षण नोंदवत न्यायाधीशांनी सोमवारी हा निकाल दिला. हा सत्तेचा आणि अधिकाराचा स्पष्ट गैरवापर असल्याचे ताशेरेही कोर्टाने ओढले आहेत. गेल्या महिन्यातच या अधिकाऱ्यांना हत्येप्रकरणी दोषी ठरवण्यात आले होते. त्यांनी केवळ मारहाण केली नाही, तर



हत्येच्या उद्देशानेच हे कृत्य केले, असे न्यायाधीश म्हणाले. आरोपींनी निःशस्त्र लोकांवर हल्ला केला आहे, त्यामुळे त्यांचे वय किंवा कौटुंबिक पार्श्वभूमी लक्षात घेऊन त्यांना कमी शिक्षा दिली जाऊ शकत नाही, असेही कोर्टाने स्पष्ट केले. या प्रकरणात एकूण १० पोलिसांना अटक करण्यात आली होती, मात्र त्यातील एकाचा २०२० मध्येच कोरोनामुळे मृत्यू झाला होता.

या घटनेनंतर तमिळनाडूमध्ये मोठ्या प्रमाणावर निदर्शने झाली होती. राजकीय नेत्यांपासून ते क्रिकेटपटू शिखर धवनपर्यंत अनेकांनी सोशल मीडियावर या बाप-लेकाला न्याय मिळवून देण्याची मागणी केली होती. या घटनेने भारतातील पोलीस यंत्रणेतील अत्याचाराचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आणला आहे. मानवाधिकार संघटनांच्या मते, दरवर्षी भारतात कोठडीत शेकडो मृत्यू होतात, जे रोखण्यासाठी पोलीस यंत्रणेत मोठ्या सुधारणांची गरज आहे. दोषी ठरवण्यात आलेल्या या ९ अधिकाऱ्यांना आता या शिक्षेविरोधात उच्च न्यायालयात अपील करण्याची संधी उपलब्ध असेल.

# भोंदूबाबा अशोक खरातचा अडचणीत वाढ

## ईडीकडून मनी लाँड्रिंगचा गुन्हा दाखल

नाशिक (प्रतिनिधी)

अशोक खरात प्रकरणात दररोज नवे धक्कादायक खुलासे समोर येत असून, स्वतःला आध्यात्मिक गुरु म्हणवणाऱ्या खरातच्या अडचणी आणखी वाढल्या आहेत. शेकडो महिलांचे लैंगिक शोषण केल्याचा गंभीर आरोप असलेल्या खरातविरोधात आधीच १३ गुन्हे दाखल आहेत. आता या प्रकरणात अंमलबजावणी संचालनालयाने देखील प्रवेश केला असून, खरातविरोधात मनी लॉँड्रिंगचा गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

खरातवर केवळ लैंगिक अत्याचाराचेच नव्हे, तर फसवणुकीच्या माध्यमातून कोट्यवधी रुपयांची संपत्ती उभी केल्याचे आरोपही आहेत. नाशिक पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, ईडीने आर्थिक गैरव्यवहाराचा सखोल तपास सुरू केला आहे. पोलिसांनी जमा केलेली महत्त्वाची कागदपत्रे ईडीच्या ताब्यात देण्यात आली असून, खरातचे आर्थिक साम्राज्य नेमके कसे उभे राहिले, याचा तपास सुरू आहे. दरम्यान, या प्रकरणात खरातची पत्नी कल्पना खरात हिचा शोध घेण्यासाठी विशेष तपास पथक सक्रिय झाले आहे. तिच्या अटकेसाठी नाशिक, पुणे आणि अहिल्यानगर या तीन जिल्ह्यांत स्वतंत्र पथके पाठवण्यात आली आहेत.













# पत्रकार सत्य शोधनातून चमत्कारांच्या दाव्यांची चिकित्सा करु शकतात - डॉ. गोराणे

अहिल्यानगर (युवावार्ता प्रतिनिधी)- अगतिक, असुरक्षित आणि वैज्ञानिक दृष्टिकोन नसलेले लोक भोंदूगिरीला बळी पडतात. हे रोखायचे असेल तर पत्रकारांनी तथ्याधारित वार्तांकन करायला हवे. सत्यशोधन करत पत्रकारांनी चमत्कारांच्या दाव्यांची चिकित्सा केल्यास समाजाचे आकलन परिपक्व होईल, असे प्रतिपादन अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे राज्य प्रधान सचिव डॉ. टी. आर. गोराणे यांनी केले. अहिल्यानगर शहरातील पत्रकारांनी 'पत्रकार कट्टा' हा उपक्रम सुरू केला आहे. या उपक्रमांतर्गत येथील सीएसआरडी संस्थेच्या सभागृहात सोमवारी 'समाजातील अंधश्रद्धा अन् माध्यमांतील वार्तांकन' या विषयावर डॉ. गोराणे यांनी मार्गदर्शन केले. भोंदूबाबा चमत्कार दाखवून कशी फसवणूक करतात, याचे प्रात्यक्षिक त्यांनी



दाखविले. गोराणे म्हणाले, समाजाते शिक्षण आहे मात्र, वैज्ञानिक दृष्टीकोन आणि नैतिकता विकसित झालेली नाही.

अहिल्यानगरमधील पत्रकारांचा विचार, संवाद, अभिव्यक्तीचा मंच त्यामुळे समाजाला विचार, भावना आणि नैतिकता यांचा समतोल साधता येत नाही. अनेक लोक भावनेला बळी पडतात. तेथे विचार मरतात. भोंदू लोक या मानसिकतेचा फायदा घेतात. अशा स्थितीत पत्रकारांची भूमिका महत्त्वाची आहे. पत्रकार हा देखील कार्यकर्ता असतो. जैथे समाजाची फसवणूक होत असेल व निराधार दावे केले जात असतील तेथे पत्रकार प्रत्यक्ष पडताळणी करून वार्तांकन करु शकतात. पत्रकारितनेही अनेक अंधश्रद्धा उघड केलेल्या आहेत.

अंधश्रद्धा हा काळाबाजार आहे. कुठलीही जात, धर्म यास अपवाद अंधश्रद्धेचे दुष्परिणाम नाही. समाजाला समजावून सांगणे हे समाजाचे प्रबोधन करण्याचेच काम आहे. हे अभिव्यक्ती स्वातंत्र्य माध्यमांना आहे, असेही ते म्हणाले. सीएसआरडीचे प्रा. डॉ. सुरेश मुगुटमल कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. नितीन पोटलाशेरू यांनी प्रास्ताविक केले. सूर्यकांत नेटके यांनी आभार मानले. यावेळी विविध माध्यमांतील पत्रकार, अंनिसच्या चळवळीतील कार्यकर्ते उपस्थित होते.


## ही दोस्ती तुटायची नाही...



उद्योजक दिलीप पारख यांना
सामाजिक कार्यकर्ते सुनिल उकिर्डे
यांच्याकडून वाढदिवसाच्या
शुभेच्छा...


# अकोलेत पंडित दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण महा अभियानाचे उद्‌घाटन

अकोले (युवावार्ता प्रतिनिधी)- भारताला स्वातंत्र्य रक्त सांडून मिळाले असून, स्वातंत्र्यवीर सावरकर आणि नेताजी सुभाष चंद्र बोस यांनी स्वातंत्र्यासाठी प्रचंड संघर्ष केला आहे. मात्र, भारतीय संविधानाचे काँग्रेस आणि नेहरू गांधी घराण्याने खून केले आहे, असे भारतीय जनता पार्टीचे प्रदेश कार्यालय प्रभारी श्री. रवीजी आनासपुरे यांनी भारतीय स्वातंत्र्याच्या इतिहासावर महत्वपूर्ण मते व्यक्त केली. अकोले येथे पंडित दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण महा अभियानाच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी राजूरच्या माजी सरपंच श्रीमती हेमलता पिचड होत्या. यावेळी अकोले एज्युकेशन संस्थेचे कायम विश्वस्त गिरजाजी जाधव, अध्यक्ष सुनील दातीर, सचिव सुधाकर देशमुख, जिल्हा उपाध्यक्ष यशवंत आभाळे आणि इतर मान्यवर उपस्थित होते.




संविधानासाठी लढणारा भाजपा हा पक्ष आहे. काँग्रेसच्या काळात अनेक वेळा संविधान बदलवले आहे. भाजपा कार्यकर्ता सत्ता ही सेवेसाठी मानतो. भाजपा हा कार्यकर्त्यांच्या त्यागावर उभारलेला पक्ष असून, पक्षातील पद ही मिरवायची नसून दायित्वाची आहेत, असेही मत रवीजी आनासपुरे यांनी व्यक्त केले.

यावेळी सहा सत्रात कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करण्यात आले. भारतीय जनता युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष श्री. रोहित चौधरी यांनी वैचारिक अधिष्ठानावर भाष्य केले. यावेळी सोमदास पवार हे अध्यक्षस्थानी होते. भाजपा इतिहास आणि पक्षाचा विस्तारा यावर जिल्हा महामंत्री सीताराम भांगरे यांनी मार्गदर्शन केले. त्यावेळी अगस्ती साखर कारखान्याचे माजी संचालक भाऊसाहेब वाकचौरे यांनी अध्यक्षस्थान भूषवले. बूथ व्यवस्थापन मन की बात या विषयावर जिल्हा सचिव सोनाली नाईकवाडी यांनी विचार केले. माजी तालुकाध्यक्ष धनंजय संत हे अध्यक्षस्थानी होते. सोशल मीडिया आणि अन्य कार्यावर सोशल मीडिया सेल चे जिल्हा संयोजक भाऊसाहेब वाकचौरे यांनी मार्गदर्शन केले. त्यावेळी भाऊसाहेब आभाळे हे अध्यक्षस्थानी होते.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अकोले मंडल अध्यक्ष राहुल देशमुख, कोतुळ मंडल अध्यक्ष बाळासाहेब सावंत, देवठाण मंडल अध्यक्ष वाल्मीक नवले, सरचिटणीस संतोष तिकांडे, प्रकाश कोरडे, माधव ठुबे आणि अशोक आवारी यांनी विशेष प्रयत्न केले. समारंभाची समाप्ती एक प्रेरणादायक आणि ज्ञानवर्धक कार्यशाळेच्या रूपात झाली, जिथे भाजपा कार्यकर्त्यांना पक्षाच्या इतिहास, ध्येय आणि कार्यप्रणालीच्या विविध पैलूंवर दृष्टिकोन दिले गेले.

# झोळेतील खर्डे परिवाराचे यश



संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)- झोळे गावातील भूमिपुत्र ज्ञानदेव तुकाराम खर्डे सर यांच्या कुटुंबियांनी विविध क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन करून गावाचा नावलौकिक उंचावला आहे.

त्यांचे सुपुत्र अक्षय ज्ञानदेव खर्डे यांना स्टेट बँक ऑफ इंडिया मध्ये फील्ड ऑफिसर पदावर पदोन्नती मिळाली आहे. तसेच त्यांची सून सौ. पल्लवी अक्षय खर्डे यांची एमपीएससीच्या माध्यमातून नाशिक महानगरपालिकेत असिस्टंट इंजिनिअर पदावर निवड झाली आहे. या दोन्ही सत्कारमूर्तींचा सत्कार सोपान संतू खर्डे (सदस्य, ग्रामपंचायत झोळे) व मेजर गोविंद रामचंद्र खर्डे (उपसरपंच, झोळे) यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या.

तसेच खर्डे कुटुंबातील दुसरे सुपुत्र चिरंजीव आकाश ज्ञानदेव खर्डे यांचीही बँकिंग क्षेत्रातील नामांकित बँक ऑफ बडोदा मध्ये मॅनेजर पदावर निवड झाली आहे. त्यांच्या या यशाबद्दलही सर्व स्तरांतून कौतुक होत असून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. झोळे गावासाठी हा अभिमानाचा क्षण असून खर्डे कुटुंबाच्या या यशामुळे गावाचे नाव उज्ज्वल झाले आहे.

# ऊर्जा क्षेत्रातील योगदानाबद्दल अभिनव गोडसे यांना मानद डॉक्टरेट

नाशिक (युवावार्ता प्रतिनिधी)- नाशिक येथील रहिवासी श्री. अभिनव निवृत्ती गोडसे यांना अमरावती येथील छत्रपती शिवाजी महाराज लोक विद्यापीठ यांच्या तर्फे, त्यांनी ऊर्जा क्षेत्रात, विशेषतः अपारंपारिक ऊर्जा क्षेत्रामध्ये महाराष्ट्र राज्यात २५ वर्ष सातत्याने उल्लेखनीय काम केल्याबद्दल, त्यांना या विद्यापीठातर्फे मानद डॉक्टरेट ही पदवी बहाल करण्यात आली आहे. सदर पदवीदान समारंभ अखिल भारतीय कुर्मी क्षत्रिय समाज अधिवेशन, जबलपूर, मध्य प्रदेश येथे, दिनांक चार एप्रिल २०२६ रोजी, मध्यप्रदेशातील विविध मान्यवरांच्या उपस्थितीत देण्यात आला.

श्री. अभिनव गोडसे नाशिक, अहिल्यानगर, सातारा, वर्धा, अकोला या जिल्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर अपारंपारिक ऊर्जा क्षेत्रात काम करत असून, विशेषतः सिन्नर व अकोले तालुका मधील पवन ऊर्जा व सौर ऊर्जा प्रकल्प कार्यरत केले आहेत. महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर सौर ऊर्जा क्षेत्रामध्ये सुजलोन एनर्जी, टाटा पावर, जेएसडब्ल्यू एनर्जी, एन रिच सोलार अशा विविध कंपन्यांबरोबर काम केले आहे व कार्यरत आहे.



त्यांच्या कामामुळे महाराष्ट्रामध्ये ऊर्जा क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात गुंतवणूक झाली असून, त्यामुळे प्रदूषण विरहित ऊर्जा निर्मिती तसेच शेतकरी विकासात्मक दृष्टिकोन असे उल्लेखनीय काम केल्याच्या प्रित्यर्थ त्यांना सदर डॉक्टरेट पदवी देण्यात आली. याशिवाय भारतीय कृषी समाज, नवी दिल्ली या संस्थेचे महाराष्ट्र प्रांताचे उपाध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत, तसेच सेवक मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह सोसायटी, नवी दिल्ली या संस्थेचे संचालक म्हणून नव्यानेच नेमणूक झालेली आहे. भारतीय कृषक समाजाचे नाशिक जिल्ह्याचे अध्यक्ष म्हणूनही जबाबदारी आहे.

# ऑनलाइन पेमेंट नियमांमध्ये मोठे बदल

## डिजिटल व्यवहार अधिक सुरक्षित




१ एप्रिल २०२६ पासून ऑनलाइन पेमेंट करण्याचा मार्ग, ओटीपी टाकण्याची पद्धत आणि तुमचे बँक खाते सुरक्षित ठेवण्याची प्रणाली पूर्णपणे बदलणार आहे. १ एप्रिल २०२६ पासून लागू होणारा पहिला नियम डायनॅमिक टू फॅक्टर ऑथेंटिकेशन आहे. याचा अर्थ, आता तुमचे प्रत्येक पेमेंट कोठून केले जात आहे हे तपासले जाईल.

दुसरा नियम असा आहे की तुम्ही बँकिंग पमध्ये स्क्रीनशॉट किंवा स्क्रीन रेकॉर्डिंग घेऊ शकणार नाही. यावर पूर्ण बंदी असेल. कारण स्कॅमर स्क्रीन रेकॉर्ड करून ओटीपी आणि पासवर्ड मिळवतात व तुमचे पैसे काढण्याचा प्रयत्न करतात.

तिसरा नियम असा आहे की तुम्ही रात्रीचे व्यवहार लॉक करू शकता. बँकांच्या अर्जामध्ये ही सुविधा असेल. तुम्ही व्यवहार ठराविक वेळेत लॉक केल्यास त्या काळात खात्यातून कोणताही व्यवहार होणार नाही.

चौथा नियम असा आहे की फसवे प किंवा मालवेअर डाउनलोड केल्यास त्वरित चेतावणी दिली जाईल.

पाचवा नियम म्हणजे ओटीपी प्रणालीमध्ये बदल. एसएमएसवरील ओटीपी बंद केला जाईल आणि तो थेट बँकिंग पमध्ये मिळेल.

सहावा नियम असा आहे की प्रत्येक व्यवहारावर अतिरिक्त सुरक्षा प्रश्न विचारले जाऊ शकतात. विशेषतः मोठ्या रकमेच्या व्यवहारांमध्ये ओळख पडताळण्यासाठी वैयक्तिक प्रश्न विचारले जातील. योग्य उत्तरे दिल्यास व्यवहार पूर्ण होईल, अन्यथा बँकेला संशयाची सूचना मिळेल.

सातवा नियम म्हणजे वर्तन बायोमेट्रिक्स. यामध्ये तुमचा टायपिंगचा वेग आणि मोबाइल वापरण्याची पद्धत यावरून तुमची ओळख निश्चित केली जाईल.

आठवा नियम म्हणजे आधार आणि बायोमेट्रिक्सची पडताळणी. मोठ्या रकमेच्या व्यवहारासाठी आधार लिंक, फिंगरप्रिंट किंवा फेस स्कॅन आवश्यक असेल. ही माहिती जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचवा. स्वतःला आणि इतरांनाही जागरूक करा. डिजिटल बँकिंग घोटाळ्यांपासून सावध रहा.

# संगमनेरमध्ये सामुदायिक व्रतबंध सोहळा

## पुरोहित व हरिहर प्रतिष्ठानच्यावतीने धार्मिक संस्कार

संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)- पवित्र भारतीय संस्कार व संस्कृती जतन करण्याचा प्रामाणिक प्रयत्न करणारा ब्राह्मण समाज देशाला दिशा देण्यात अग्रेसर आहे, असे प्रतिपादन प्रथितयश उद्योगपती व सामाजिक कार्यकर्ते गिरिश मालपाणी यांनी येथे केले. २९ मार्च रोजी संगमनेर मध्ये पुरोहित व हरिहर प्रतिष्ठानच्या वतीने मालपाणी लॉन्स येथे व्रतबंध सोहळा संपन्न झाला. या सोहळ्यात ८ बटूना मौंजीबंधनाचे उपनयन संस्कार विधीवत देण्यात आले. संगमनेर मधील विविध क्षेत्रातील मान्यवर बटूना शुभाशीर्वाद देण्यासाठी उपस्थित होते. यावेळी व्यासपीठावर उद्योगपती मालपाणी यांच्यासह, नगरसेविका सौ. नंदाताई मुकुंद



गरुडकर, मा. उपनगराध्यक्ष किशोरजी कालडा, शिक्षण प्रसारक संस्थेचे उपाध्यक्ष विलास काका सराफ, दै. युवावर्ता चे संपादक किसनराव हासे, सुहास बेलापूरकर, भाऊ जाखडी, संदीप वैद्य आदी मान्यवर उपस्थित होते.

श्री. मालपाणी यांनी आपल्या भाषणात पुरोहित प्रतिष्ठानच्या सामाजिक बांधिलकीचे कौतुक केले. पुरोहित संघाने अतिशय देखणा सोहळा आयोजित करून व्रतबंध संस्कार घडवून आणले, ही गोष्ट प्रशंसनीय आहे. खरोखरच ब्राह्मण समाजाचे कौतुक केले पाहिजे. या समाजात वाखाणण्याजोगी गुणवत्ता, सचोटी, धार्मिकता आहे. आमच्या हॉल मध्ये हा पवित्र सोहळा संपन्न झाला, ही आमच्या दृष्टीने मोठी आनंदाची व पुण्याची गोष्ट आहे. संस्थेचे अध्यक्ष भाऊ जाखडी आमच्या सोबत विविध सामाजिक कार्यात आघाडीवर असतात. संस्कार ही भारतीय संस्कृतीची जगात ओळख आहे, ही ओळख जपण्याचे महान कार्य पुरोहित संघ करीत आहे.

पुरोहित संघाचे संस्कृती व संस्कार संवर्धनाचे कार्य ही देशासाठी अत्यंत उपयुक्त कामगिरी असल्याचे मत त्यांनी मांडले. सर्व उपस्थितांसाठी भोजन व्यवस्था करण्यात आली होती. पुरोहित संघाचे जेष्ठ सदस्य अरुण कुलकर्णी, उमेश जोशी, अनिल शेटे, दत्तात्रय बल्लाळ, अभय देशपांडे, योगेश म्हाळस, सागर काळे, प्रतीक जोशी, प्रकाश शेटे, पवन काळे, शंतनू जाखडी, मल्हार सराफ, वेदांत जोशी, आदित्य कुलकर्णी, बापू दाणी आदी सर्व पदाधिकारी यावेळी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेचे उपाध्यक्ष संदीप वैद्य यांनी तर आभारप्रदर्शन सुहास बेलापुकर यांनी, तर सूत्रसंचालन मुरारी देशपांडे यांनी केले. श्री. मालपाणी यांचा वाढदिवस असल्याने पुरोहितांनी आशीर्वचन मंत्राच्या घोषात त्यांच्यावर अक्षता व फुलांचा वर्षाव करून त्यांना शुभेच्छा दिल्या.

# संपादकीय...

## स्ट्रोकची चाहूल

## वेळेत ओळखा, जीव वाचवा

भारतातील स्ट्रोकची साथ ही प्रत्यक्षात दिसणारी एक मोठी लाट आहे, पण तिच्या खाली दडलेला खरा धोका म्हणजे उच्च रक्तदाबाचा अदृश्य हिमनग आहे. या संकटावर मात करण्याचा एकमेव मार्ग म्हणजे लवकर तपासणी, मीठाच्या वापरावर नियंत्रण, मजबूत प्राथमिक आरोग्यसेवा आणि व्यापक जनजागृती होय. स्ट्रोक ही एक वैद्यकीय आपत्ती आहे, परंतु ती याचबरोबर आरोग्य व्यवस्थेतील त्या त्रुटींचा पुरावा आहे, जिथे शरीरातील नुकसान हळूहळू वाढत गेले, मोजले गेले नाही आणि वर्षानुवर्षे उपचारांशिवाय राहिले. भारतात दर १ लाख लोकांमागे अंदाजे १०० ते १५० स्ट्रोक रुग्ण आढळतात, म्हणजेच दरवर्षी सुमारे १४ लाख ते २१ लाख प्रकरणे नोंदवली जातात. आज स्ट्रोक हा देशातील मृत्यूंच्या प्रमुख कारणांपैकी एक ठरला आहे. मात्र, या आजाराची सुरुवात अचानक होत नाही; ती अनेक वर्षांपूर्वी सुरू झालेल्या दुर्लक्षातून होते. स्ट्रोक समजून घेताना हृदयविकार प्रणालीची तुलना महानगरपालिका पाणीपुरवठा व्यवस्थेशी करता येते. हृदय म्हणजे एक पंप, धमन्या म्हणजे दाबाच्या नळ्या, आणि रक्त म्हणजे त्यातून वाहणारे जीवनदायी द्रव. जेव्हा रक्तदाब वाढतो, तेव्हा या नळ्यांवर सतत ताण येतो. कालांतराने त्या कडक होतात, त्यामध्ये साच तयार होतो आणि काही ठिकाणी त्या कमकुवत होतात. अशा वेळी अचानक अडथळा निर्माण होणे किंवा नळी फुटणे, हेच स्ट्रोकचे मूळ कारण ठरते. स्ट्रोकचे दोन प्रमुख प्रकार आहेत. पहिला प्रकार म्हणजे इस्केमिक स्ट्रोक, ज्यामध्ये रक्ताच्या गुठळ्यांमुळे मेंदूकडे जाणारा रक्तपुरवठा थांबतो. भारतातील सुमारे ७० ते ८० टक्के स्ट्रोक या प्रकारचे असतात. दुसरा प्रकार म्हणजे हॅमरेजिक स्ट्रोक, ज्यामध्ये रक्तवाहिनी फुटते आणि मेंदूमध्ये रक्तस्राव होतो. हा प्रकार कमी प्रमाणात आढळतो, परंतु अधिक घातक असतो. या दोन्ही प्रकारांमध्ये सर्वात महत्त्वाचा घटक म्हणजे वेळ. न्यूरोलॉजिस्टच्या मते, उपचार न मिळाल्यास एका मिनिटात लाखो न्यूरॉन्स नष्ट होतात. त्यामुळे प्रत्येक मिनिट महत्त्वाचा असतो. चेहऱ्याचा एक भाग सैल पडणे, हात-पायात कमजोरी येणे, बोलण्यात अडचण येणे, अचानक दृष्टी कमी होणे किंवा बेशुद्ध पडणे ही स्ट्रोकची महत्त्वाची लक्षणे आहेत. ही लक्षणे दिसताच तातडीने वैद्यकीय मदत घेणे अत्यावश्यक आहे. सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने उच्च रक्तदाब ही एक हिमनगासारखी समस्या आहे. वर दिसणारा भाग म्हणजे ज्या लोकांना आपला रक्तदाब माहित आहे आणि ते उपचार घेत आहेत. परंतु मोठा भाग असा आहे, ज्यांना रक्तदाब आहे पण त्याची कल्पनाच नाही. भारतात केवळ २८ टक्के लोकांना आपला उच्च रक्तदाब माहित असतो, त्यापैकी अर्धेच उपचार घेतात आणि त्यापैकीही फारच कमी लोकांचा रक्तदाब नियंत्रणात असतो. यामुळेच स्ट्रोकसारख्या गंभीर आजारांचे प्रमाण वाढत आहे. या समस्येवर उपाय म्हणून सर्वात सोपा आणि प्रभावी मार्ग म्हणजे मीठाचे सेवन कमी करणे होय. जागतिक आरोग्य संघटनेनुसार दररोज ५ ग्रॅमपेक्षा कमी मीठ सेवन करणे आवश्यक आहे, परंतु भारतात सरासरी ८ ते ११ ग्रॅम मीठ वापरले जाते. त्यामुळे मीठाचे प्रमाण कमी करणे, प्रक्रिया केलेल्या अन्नावर नियंत्रण ठेवणे आणि जनजागृती करणे अत्यंत गरजेचे आहे. तसेच प्राथमिक आरोग्यसेवा मजबूत करणेही आवश्यक आहे. प्रत्येक आरोग्य तपासणीमध्ये रक्तदाब मोजणे ही सवय रुजवली पाहिजे. समुदाय आरोग्य कर्मचारी, आशा कार्यकर्त्या आणि वैद्यकीय कर्मचारी यांची भूमिका येथे महत्त्वाची ठरते. त्यांनी रुग्णांशी सतत संपर्क ठेवून औषधोपचार सुरू ठेवण्यास प्रोत्साहन दिले पाहिजे. तंत्रज्ञानाचाही यामध्ये मोठा वाटा आहे. दूरसंचार वैद्यकशास्त्राच्या माध्यमातून ग्रामीण भागातील रुग्णांना तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला सहज उपलब्ध होऊ शकतो. काही राज्यांमध्ये टेलि-स्ट्रोक सुविधा सुरू झाल्यामुळे उपचार वेळेत मिळण्यास मदत होत आहे. दीर्घकालीन यशासाठी जनजागृती हा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. लोकांना रक्तदाब तपासा आणि स्ट्रोकची लक्षणे ओळखा हे संदेश सातत्याने दिले गेले पाहिजेत. शाळा, कार्यालये आणि सार्वजनिक ठिकाणी तपासणी शिबिरे आयोजित केली पाहिजेत. फास्ट या संकल्पनेप्रमाणे चेहरा सैल पडणे, हात कमजोर होणे, बोलण्यात अडचण आणि त्वरित मदत घेणे, हे सर्वांना माहित असणे आवश्यक आहे. तसेच सीपीआर प्रशिक्षणही लोकांपर्यंत पोहोचवले पाहिजे. काही वेळा स्ट्रोकमुळे रुग्ण बेशुद्ध पडतो किंवा हृदय थांबते. अशावेळी तात्काळ दिलेले सीपीआर प्राण वाचवू शकते.


CorelDRAW Ps Ai Id

WE ARE HIRING
JOIN OUR TEAM

GRAPHIC DESIGNER

Send Resume on Whatsapp
Contact : 7720046005


# अमृतवाहिनीच्या अमृतस्पंदन मधून देशाच्या सांस्कृतिक परंपरेचे दर्शन



संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)- महाराष्ट्रात सह पुणे विद्यापीठात गुणवत्तेने अग्रगण्य ठरलेल्या अमृतवाहिनी अभियांत्रिकी महाविद्यालयाने विद्यार्थ्यांना चांगल्या उच्च शिक्षणाबरोबर त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी विविध सांस्कृतिक कार्यक्रमांमधून सातत्याने प्रोत्साहन दिले आहे. अमृत स्पंदन या वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी मराठमोळ्या कार्यक्रमासह भारताच्या एकतेचे सांस्कृतिक दर्शन दाखवणाऱ्या विविध सांस्कृतिक कार्यक्रमांची रंगत भरत आपले दर्जेदार कलाविष्कार सादर केले.

अमृतवाहिनी अभियांत्रिकी महाविद्यालयात अमृत स्पंदन २०२६ या वार्षिक स्नेहसंमेलन विविध सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न झाले. यावेळी अमृत कलामंच येथे उद्घाटन प्रसंगी मा. आ. डॉ. सुधीर तांबे, विश्वस्त ॲड. आर. बी. सोनवणे, विलास वर्पे, तुळशीनाथ भोर, सीईओ अनिल शिंदे, प्राचार्य डॉ. एम. ए. व्यंकटेश यांसह मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात ढोल ताशांच्या गजरात पारंपारिक पद्धतीने फेटे बांधून, हवेत बलून सोडून करण्यात आले. यावेळी झांजरी पथक आणि लेझीम पथकाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. याच दरम्यान झालेल्या ट्रॅडिशनल डे, मिस मॅच, रेट्रो व बॉलीवूड डे या उपक्रमांमध्ये विद्यार्थ्यांनी मनसोक्त आनंद लुटला.

सांस्कृतिक कार्यक्रमांमधून गणरायाला वंदनासाठी व्यासपीठावर एकाच वेळी अवतरलेले ३० विद्यार्थी वर्ग, स्टेज आकर्षक लाइटिंग आणि गणेश वंदना, यातून सुरुवात झाली. यानंतर बासरी संगीतावर झालेले नृत्य, बॉलीवूड गाण्यांवरील मिक्स फ्युजन साँग, यांनी लक्ष वेधून घेतले, तर भक्ती टिळेकर सादर केलेल्या लावणीने मराठमोळे वातावरण निर्माण केले. बिहू नृत्य, पंजाबी भांगडा, आसामी नृत्य, देवीचा गोंधळ, खंडोबा गीते, आईच्या जागर, या मराठी गीतांना टाळ्यांची मोठी दाद मिळाली.

सून रही है ना, नवरी आली या गीतांना विद्यार्थ्यांनी डोक्यावर घेतले. तारक मेहता का उल्टा चश्मा या नाट्यछटाने सर्वांना खळखळून हसवले, तर लख्ख पडला प्रकाश या गीताने अंगावर शहारे आणले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारित जाणता राजा या नाट्यप्रयोगाने इतिहासकालीन प्रसंग उभे करत रोमांचकारी वातावरण निर्माण केले. यावेळी झालेल्या घोषणाबाजीने परिसरात भक्तीपूर्ण वातावरण निर्माण झाले.

माजी आमदार डॉ. सुधीर तांबे म्हणाले की, विद्यार्थ्यांना अभ्यास महत्त्वाचा आहेच, परंतु त्याचबरोबर त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी सांस्कृतिक उपक्रमांना ही तितकेच महत्त्व आहे. विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रम, क्रीडा स्पर्धा यामधून सहभाग नोंदवणे गरजेचे आहे. प्रत्येकासाठी महाविद्यालयीन जीवन हे जीवनासाठी कायम मोठा अनमोल असल्याचे ते म्हणाले.

तर प्राचार्य डॉ. व्यंकटेश म्हणाले की, अमृतवाहिनी महाविद्यालयाने सातत्याने चांगले शिक्षण दिले असून महाविद्यालयाला स्वायत्त दर्जा मिळाला आहे. विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, नेतृत्वगुण आणि सर्जनशीलता विकसित करण्यासाठी हे उपक्रम महत्त्वाचे असल्याचे ते म्हणाले. यावेळी मान्यवर पाहुण्यांच्या हस्ते शैक्षणिक व क्रीडा स्पर्धांमध्ये विशेष प्राविण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रा. संदीप पंडित व प्रा. मयुरी गाडे यांच्यासह विविध शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे माजी मंत्री बाळासाहेब थोरात, मा. आ. डॉ. सुधीर तांबे, विश्वस्त शरयूताई देशमुख, प्राचार्य डॉ. एम. ए. व्यंकटेश, यांच्यासह सर्व मान्यवरांनी अभिनंदन केले आहे.


**पाहिजेत**
मेडिकल दुकानासाठी महिला पाहिजे
कॉम्प्युटर ऑपरेटर - २
हेल्पर - २
प्रभात मेडिकल, नवीन नगर रोड, ताजने मळा, संगमनेर
9921245753

**CHANGE IN NAME**
I HAVE CHANGED MY OLD NAME
SANGRAM SANJAYRAO DESHMUKH
TO NEW NAME AS
SANGRAM SANJAY DESHMUKH
BY AFFIDAVIT NO 389/2026
DATE 06/04/2026

**CHANGE IN NAME**
I HAVE CHANGED MY OLD NAME
SANJAYRAO DESHMUKH
TO NEW NAME AS
SANJAY DESHMUKH
BY AFFIDAVIT NO 390/2026
DATE 06/04/2026

**CHANGE IN NAME**
I HAVE CHANGED MY OLD NAME
UJWALABAI DESHMUKH
TO NEW NAME AS
UJWALA DESHMUKH
BY AFFIDAVIT NO 391/2026
DATE 06/04/2026

**पाहिजेत**
अकाउंटंट - ०२ जागा
टॅली कोर्स
ड्रायव्हर - ३ जागा
कॉम्प्युटर ऑपरेटर
संपर्क - डॉ. इथापे हॉस्पिटल, नवीन नगर रोड संगमनेर
9370071777
9822791484

**पाहिजेत**
वेल्डिंग कामासाठी कामगार पाहिजेत
वेल्डर
हेल्पर
7030125701

**CHANGE IN NAME**
I HAVE CHANGED MY OLD NAME
TABASSUM IBRAHIM KHAN
TO NEW NAME AS
TABASSUM IBRAHIM ATTAR
ADD – 720, KUMBHAR ALA, SANGAMNER, TAL SANGAMNER DIST AHMEDNAGAR

**CHANGE IN NAME**
I HAVE CHANGED MY OLD NAME
SANA ALAUDDIN
TO NEW NAME AS
SHABNAM JUBER ATTAR
ADD – KUMBHAR GALLI ,BAZAR PETH , SANGAMNER, TAL SANGAMNER DIST AHMEDNAGAR

**भाड्याने देणे आहे**
सर्व सुविधायुक्त ०१ बीएचके रो-हाऊस भाड्याने देणे आहे
सुकेवाडी रोड, संगमनेर
8282825818

**त्वरित पाहिजेत**
द्वारकादास शामकुमार
सेल्समन | कॅशियर
स्टोअर मॅनेजर
फ्लोअर मॅनेजर
हेल्पर | सिक्युरीटी
कामाची सोयीस्कर वेळ
१० ते ७ | १२ ते ९
9511238422

**धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल**
We treat He cure's
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा: मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

**युवावार्ता** परिवर्तनाचा पुरस्कर्ता
**पाहिजेत**
अकाऊंटंट | जागा ०२
टॅली ईआरपी ९ चे ज्ञान आवश्यक, अकौंट, बँक, रिपोर्ट जनरेशन, सॅलरी, जीएसटी, रिकव्हरी आदींचे सखोल ज्ञान आवश्यक,
अनुभव : ३ वर्षे
आकर्षक पगार व इतर सुविधा
बायोडाटा पाठवा - ९८२२०३९४६०
dailyyuvavarta@gmail.com
वाटचाल तीन दशकांची






अक्षयतृतीयेच्या शुभमुहूर्तावर
MALPANI
**मालपाणी उद्योग समूह** आयोजित
**भव्य सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळा!**
रविवार, दि. १९ एप्रिल २०२६, सायं.४ वाजता | ठिकाण – मालपाणी लॉन्स, कॉलेज रोड, संगमनेर
- प्रत्येक नवविवाहित दाम्पत्याला स्टील कपाट, दिवाण-गादी व संसारोपयोगी साहित्य भेट!
- वरासाठी ड्रेस, फेटा/उपरणे व वधुसाठी साडी
- सर्वांसाठी भोजन व्यवस्था

सर्वधर्मीयांसाठी खुला व मोफत विवाह सोहळा
नोंदणीसाठी कायद्यानुसार वधूचे वय १८ वर्षे व वराचे वय २१ वर्षे असणे बंधनकारक
विवाह नोंदणी सुरु झाली आहे, त्वरित संपर्क करावा...प्रवेश मर्यादित!
संपर्क : एच.आर. विभाग, मालपाणी इंडस्ट्रीयल पार्क, अकोले रोड, संगमनेर
श्री. राहुल शेरमाळे (9960 253 607) | श्री. रविंद्र कानडे (9850 890 618)


तहसिलदार,तथा कार्यकारी दंडाधिकारी संगमनेर, यांचे कार्यालय ता. संगमनेर,जिल्हा अहिल्यानगर

ई-मेल : tahsildarsangamner@gmail.com
क्र. कावी/ जन्म नोंद/५२५/२०२६
दूरध्वनी (०२४२५) २२५३५३
संगमनेर, दिनांक – २३/०३/२०२६

### जाहिरनामा

याद्वारे सर्व लोकांना जाहिररित्या कळविण्यात येते की, अर्जदार श्री. ईनायत इस्माईल शेख, रा. संगमनेर, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर यांनी दिनांक ०९/०३/२०२६ रोजी दाखल केलेल्या अर्जावरुन सुरु करण्यात आले. अर्जदार हे रा. संगमनेर ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर येथील रहिवासी असून अर्जदार यांचे स्वतः नामे ईनायत इस्माईल शेख, यांचा जन्म मौजे संगमनेर ता. संगमनेर जि. अहिल्यानगर येथे दिनांक ०५/०६/१९७४ रोजी झाला असून त्यांची जन्म नोंद मुख्याधिकारी तथा जन्म-मृत्यू निबंधक संगमनेर नगरपरिषद संगमनेर यांचे कार्यालयामध्ये उपलब्ध नसल्यामुळे त्याबाबतची नोंद घेण्याबाबतचे प्रकरण या कार्यालयात दाखल केले आहे.

तरी ज्या व्यक्तींना तक्रारी/हरकती दाखल करावयाच्या असल्यास मुख्याधिकारी तथा जन्म-मृत्यू निबंधक संगमनेर नगरपरिषद संगमनेर यांचे कार्यालयाचे नोटीस बोर्डावर जाहीरनामा प्रसिध्दी झाल्या पासुन ३० दिवसाचे आत सुटीचे दिवस वगळून लेखी स्वरुपात तक्रार या कार्यालयात दाखल करावी. मुदतीनंतर त्या तक्रारीचा विचार केला जाणार नाही, कृपया याची नोंद घ्यावी.

**तहसिलदार संगमनेर**


**CHANGE IN NAME**
I HAVE CHANGED MY OLD NAME
NILOFAR BANO HAROON MOMIN
TO NEW NAME AS
NILOFAR FAIROZKHAN PATHAN
ADD – 1431,OPPOSITE AMRUT NAGARI PAT SANSTHA, MOMINPURA, SANGAMNER, TAL-SANGAMNER, DIST AHMEDNAGAR

**CHANGE IN NAME**
I HAVE CHANGED MY OLD NAME
FAIRUJKHAN RAHIMKHAN PATHAN
TO NEW NAME AS
FAIROJKHAN RAHIMKHAN PATHAN
ADD – GHAR NO 143, OPPOSITE AMRUT NAGARI PAT SANSTHA, MOMINPURA , SANGAMNER, TAL - SANGAMNER, DIST - AHMEDNAGAR


**SMFRI'S**

**Vamanrao Ithape Homoeopathic Medical College & Hospital**

Tajane Mala New Nagar Road Sangamner Dist: A'Nagar (Pin 422 605)
www.smfri.org Email:- vihmc2016@gmail.com

**Applications Are Invited For The Post Of Professor, Reader And Lecturer As Per N C H Norms and Direction 01/2017 MUHS, Nashik.**

| Sr. No. | Department/ Subject | Vacant Post | | |
|---|---|---|---|---|
| | | Professor | Associate Professor (Reader) | Assistant Professor (Lecturer) |
| 1 | Physiology | 1 | -- | -- |
| 2 | Pathology & Microbiology | -- | 1 | -- |
| 3 | Suegery | 1 | -- | -- |
| 4 | Obstetrician & Gynecology | -- | -- | 1 |
| 5 | Repertory | 1 | 2 | -- |
| 6 | Psychiatric | -- | -- | 1 |
| 7 | Research Methodology & Biostatics | 1 | -- | -- |

Contact :- Principal :- 9822524202 CEO :- 9822791484


## जाहिरात छोटी सुवर्णसंधी मोठी

**पाहिजेत**
शिलाई मशीन कामासाठी महिला - ०२
सेल्स एक्झिक्युटिव्ह - ०१
अमोल होम डेकोर मालदाड रोड, संगमनेर
8788483245
8698001007

**पाहिजेत**
श्रद्धा क्लिनिक आणि पंचकर्म सेंटर
रिसेप्शनिस्ट – १ (महिला)
वेळ – सकाळी ९ ते ५
ताजणे मळा, प्रभात मेडिकल समोर, संगमनेर
7498749500

**वॉचमन पाहिजे**
बांधकाम साईट वर वॉचमन भरणे आहे
राहण्याची सोय आहे
संपर्क – नविन नगर रोड, संगमनेर
8378956909
8459199913

**पाहिजेत**
संगमनेर शहरात ऑफिस कामाकरिता पदवीधर मुलगा पाहिजे
आकर्षक पगार
9881855547

**पाहिजेत**
मार्केटिंगसाठी मुलगा पाहिजे – ०२ जागा (गाडी व लायसन्स पाहिजे)
दुकानकामासाठी डिलीव्हरी बॉय पाहिजे – ०२ जागा
9766921306

**पाहिजेत**
अकाउंटंट - ०१ जागा (बी.कॉम/ एम.कॉम) टॅली प्राईम
मायक्रोबायोलॉजी - ०१
हेल्पर (मुले/मुली)- ०३
२ ते ३ वर्ष अनुभव
रास्पबेरी ॲग्रो बिझनेस प्रा.लि., गोडगे इंडस्ट्रीअल इस्टेट, संगमनेर एम.आय.डी.सी च्या बाजूला,वेल्हाळे रोड
9860284257
raspberryagrosales@gmail.com

**पाहिजेत**
मुलगा/ पुरुष कर्मचारी
आकर्षक पगार
श्री विश्वगंध आयुर्वेद हॉस्पिटल नवीन नगर रोड संगमनेर
Biodata सह भेटणे
9822283079

**पाहिजेत**
डॉक्टर्स ०२- महिला (बी.ए.एम.एस/एम.डी.)
पंचकर्म थेरपिस्ट - ४ (स्त्री/पुरुष) ट्रेनिंग दिले जाईल
रिसेप्शनिस्ट - २ (महिला) कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक
ओ. टी. ॲसिस्टंट - १ (पुरुष)
माधवबाग क्लिनिक
९३२५०२८६८६


दैनिक युवावार्ता कार्यालय, संगमनेर,०२४२५- २२५१२९
७६२०३८८२३०, ८३८०९५६६०४, ८८३०५०८२४४

वाचकांसाठी निवेदन- सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो, यातील कोणत्याही माहितीच्या,व्यवहाराच्या सत्यतेबाबत 'दैनिक युवावार्ता व्यवस्थापन' हमी देऊ शेत नाही, याची नोंद घ्यावी

# बालकांच्या कर्करोग उपचारांसाठी मुख्यमंत्री सहाय्यता कक्षाचा पुढाकार

मुंबई (वृत्तसंस्था)

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विशेष पुढाकाराने मुख्यमंत्री सहाय्यता कक्ष, भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड (बीपीसीएल) फाऊंडेशन आणि टाटा मेमोरियल सेंटर यांच्यात बालकांच्या कर्करोगाच्या उपचारासाठी सामंजस्य करार करण्यात आला आहे. या प्रकल्पाची प्रभावी आणि पारदर्शक अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी मुख्यमंत्री सहायता कक्ष बीपीसीएल फाउंडेशन आणि टाटा मेमोरियल सेंटर यांच्यात हा त्रिपक्षीय सामंजस्य करार करण्यात आला आहे. या कराराद्वारे सर्व संबंधित घटकांमध्ये समन्वय राखला जाईल आणि प्रकल्पाच्या अंमलबजावणीस गती मिळणार आहे तसेच, प्रस्तावात नमूद केलेल्या कार्यक्षेत्र आणि जबाबदाऱ्यांना सर्व संबंधितांनी मान्यता दिली असून, अंतिम सामंजस्य कराराध्ये ठरविण्यात येणाऱ्या अटी व शर्तींचे पालन करण्याबाबत सहमती दर्शविण्यात आली आहे. या सामंजस्य करारासंदर्भात मुख्यमंत्री म्हणाले, मुलांचे संरक्षण हे राज्याचे कर्तव्य आहे. कर्करोगाविरुद्ध लढण्यासाठी लवकर निदान, परवडणारे उपचार आणि जागरूकता आवश्यक आहे. शासन आणि समाज दोघांनी मिळून हे काम करणे गरजेचे आहे.

## PUBLIC NOTICE

**Notice Under Section 67 of the T.P. Act 1882**

**Date:- 07 / 04 /2026**

All concerned, particularly the Mortgagor, Shri.Raju Dhondi Jadhav, R/o. Kothe Bk, Sangamner, Dist- Ahilyanagar and transferred by Sawleram Gahibaji Wakle, as purchaser and occupants of the schedule property described here under, are hereby notified as follows:-

**i)** The undersigned is the mortgagee holding a valid and subsisting mortgage over the schedule property as a nephew of Balwant Keshav Kulkarni (Hinge) as per mutation entry no.342 in Revenue record in the year 1938 along with all rights, appearances and structures thereon. A mortgage deed dated 5th March 1938 has been registered between mortgagor Shri.Raju Dhondi Jadhav and mortgagee Shri Balwant Keshav Kulkarni (Hinge). According to the said mortgage deed, the possession of the schedule property is handed over by the mortgagor Shri.Raju Dhondi Jadhav to the mortgagee Shri Balwant Keshav Kulkarni (Hinge) on the same date of the registered mortgage deed. The schedule property is in possession of the successor of the mortgagee, Adv. R.S.Hinge till today. The schedule property herein after referred to as mortgaged property.

**ii) Cessation of Mortgagor's Right to Redemption:-** The mortgagor Shri.Raju Dhondi Jadhav right to redeem the mortgaged property U/s.60 of T.P.Act or crystallization of mortgagee's rights under foreclosure proceeding / Non- payment of mortgage monies despite due notice. The mortgagee grandfather was paid Rs.135 to mortgagor in the year 1938 as per M.E.No.342. The Mortgagor not paid this amount to Mortgagee till today. Thus, the mortgagor's right to redeem schedule property shall be absolutely debarred of his right to redeem the mortgage property. The Mortgagee has right to prefer suit for foreclosure against Mortgagor.

**iii) Invalid Transfer of Mortgagor :-** While the mortgaged property mention in schedule is subsisted and mortgage monies (Rs.135) remained unpaid till today. The mortgagor unlawfully transfer the mortgage property by mutation entries no.405, 583, 1476 and 1641 as per revenue record. The mortgagor unlawfully transfer the property on dated-05/09/1991 to Jayawantbhai Ganga (Gangadhar) Wakle by M.E.No.405 and in the year 1991 the mortgagor sold the property to Sawleram Gahibaji Wakle by M.E.No.583. The Mortgagor on dated-16/11/1975 without any legal transaction with Mortgagee, not paid Rs.135 (Nazar Gahan Amount) made illegal M.E.No.1641 in record of right. All the above transaction was made without discharging the mortgage dues as per law and facts on record. The all transfer by M.E. 405, 583, 1476 and 1641 are void, ineffective and does not bind mortgagee rights were paramount and subsisting.

**iv) The third parties of purchase property is not binding on mortgagee:-** The third party right by M.E.No.1476, 405 by partition, purchaser acquired no valid title, interest or possession therein.

**v) Sale Deed (Schedule Property) executed in favor of mortgagee:-** Pursuant to the above, the mortgagor and said purchaser have executed and register a sale deed as per T.P.Act section- 67 in favor of the mortgagee, fully discharge the transaction and confirming absolute ownership rights of the mortgagee, over the mortgage property free from all encumbrances except as stated therein.

**vi)** All persons are hereby cautioned against dealing with mortgage property in any manner whatsoever, including entering into transaction, creating tenancies or making alternation. Any such dealing shall be at their own risk and pevil, and the mortgagee reserves the right to initiate legal proceedings for eviction, recovery of possession, damages and costs against trespassers or unauthorized occupants.

This notice is issued without prejudice the Mortgagee's right & remedies under law.

**The Schedule of Property:-**

Survey No.131/5 (Gat No. 405/1,405/1/1, 405/1/2, 405/2, 405/3,405/4), area- 8 Acre 13G, Assessment- 2 Rs.8 Aane situated at- Kothe Bk, Tal- Sangamner, Ahilyanagar.

**Full Name of Mortgagee :-**
**Adv. RupeshSharad Hinge**
R/o.FlatNo.8,Samudra Heights,
Nayantara Society,Bhelke Nagar,
Kothrud, Pune- 411038.

**Advocate for the Mortgagee:-**
**Adv. P. L. Patil**
**Pune**

# अंधश्रद्धेविरोधात राज्यभर माकपचे तीव्र आंदोलन

## मंत्री-आमदारांच्या हकालपट्टीची मागणी



युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले- राज्यात वाढत्या अंधश्रद्धा आणि भोंदूबाबांच्या कारवायांविरोधात भारतीय कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी) अर्थात (माकप) यांच्या वतीने ६ एप्रिल २०२६ रोजी राज्यभर तीव्र आंदोलन छेडण्यात आले. सिन्नर तालुक्यातील भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर मंत्री, आमदार आणि अधिकाऱ्यांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत त्यांच्या हकालपट्टीची मागणी करण्यात आली आहे.

माकपचे राज्य सचिव डॉ. अजीत नवले यांनी दिलेल्या माहितीनुसार, राज्यात तंत्र-मंत्र, अंगारे-धुपारे यांच्या नावाखाली महिलांचे व सर्वसामान्य नागरिकांचे शोषण मोठ्या प्रमाणावर वाढले आहे. नाशिक जिल्ह्यातील सिन्नर येथे अशोक खरात या भोंदूबाबाने अशाच प्रकारे अनेकांना फसवून शोषण केल्याचे समोर आले आहे.

या प्रकरणात काही लोकप्रतिनिधी, अधिकारी आणि विविध पदांवरील व्यक्ती थेट किंवा अप्रत्यक्षरित्या सामील असल्याचा आरोप माकपने केला आहे. संविधानिक पदांवर असलेल्या व्यक्तींनी वैज्ञानिक दृष्टीकोन स्वीकारण्याऐवजी अंधश्रद्धेला खतपाणी घालणे ही गंभीर बाब असल्याचे माकपने नमूद केले आहे. समाजात प्रतिष्ठा असलेल्या व्यक्ती अशा प्रकारांना समर्थन देत असल्याने सामान्य लोकही त्याला बळी पडत असल्याची टीका करण्यात आली.

माकपच्या आरोपानुसार, सुमारे ३९ आमदार या भोंदूगिरीशी संबंधित असल्याचे समोर येत आहे. या आमदारांची नावे जाहीर करून त्यांच्या सहभागाची चौकशी करावी व तत्काळ राजीनामे द्यावेत, अशी मागणी आंदोलनातून करण्यात आली. राज्यातील २१ जिल्ह्यांमध्ये या आंदोलनाचे पडसाद उमटले. विविध ठिकाणी मोर्चे, निदर्शने तसेच पुतळे जाळून संताप व्यक्त करण्यात आला. सरकारने या गंभीर प्रकरणाकडे तातडीने लक्ष देऊन दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी आंदोलकांनी केली.

माकपने पुढील प्रमुख मागण्या केल्या आहेत - भोंदूबाबा अशोक खरात व त्याच्या साथीदारांवर कठोर कारवाई, त्याची संपत्ती जप्त करून अंधश्रद्धा निर्मूलनासाठी वापरणे, संबंधित ३९ आमदारांची नावे जाहीर करणे, पीडित महिलांचे व्हिडिओ सोशल मीडियावरून तातडीने हटवणे, प्रत्येक पोलीस ठाण्यात अंधश्रद्धा निर्मूलन कक्ष स्थापन करणे, जादूटोणा विरोधी कायद्याची कठोर अंमलबजावणी, अंधश्रद्धा पसरवणाऱ्या जाहिरातींवर बंदी व नियमन या मागणी केली आहे. राज्यात गावागावांत भोंदूबाबांचे प्रमाण वाढत असून, यावर नियंत्रण ठेवण्यासाठी विशेष मोहीम राबवावी, अशीही मागणी करण्यात आली आहे. अंधश्रद्धेविरोधात वैज्ञानिक दृष्टीकोन आणि विवेकवादाचा प्रसार करणे हीच काळाची गरज असल्याचे माकपने स्पष्ट केले.

# अशोक खरात प्रकरणात दोन वरिष्ठ पोलीस अधिकारीही अडचणीत?

नाशिक (वार्ताहर)-

अशोक खरात प्रकरणी एका आयएएस अधिकाऱ्यापाठोपाठ दोन वरिष्ठ पोलीस अधिकारी गोत्यात सापडण्याची शक्यता, अशोक खरात प्रकरणी एका आयएएस अधिकाऱ्यापाठोपाठ दोन वरिष्ठ पोलीस अधिकारी गोत्यात सापडण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. दोन महिला पोलीस अधिकारी खरातच्या संपर्कात होत्या, अशी सूत्रांची माहिती आहे. एक डीसीपी, तर दुसऱ्या एसीपी दर्जाच्या अधिकारी असल्याची माहिती समोर येत आहे.

आवडती पोस्टिंग मिळावी म्हणून त्यांनी बाबाकडे धाव घेतली होती का? खरात सोबत काही आर्थिक व्यवहारही झाले का? याबाबत तपास होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. दरम्यान, या प्रकरणामुळे प्रशासकीय व पोलीस वर्तुळात खळबळ उडाली असून, संबंधित अधिकाऱ्यांच्या भूमिकेचा सखोल तपास करण्याची मागणी जोर धरू लागली आहे. तपास यंत्रणांकडून खरातच्या संपर्कातील व्यक्तींची यादी तयार करण्यात येत असून, त्यामधील व्यवहार, भेटीगाठी आणि संभाव्य आर्थिक देवाणघेवाण यांचा तपशील तपासला जाणार असल्याची माहिती समोर येत आहे.

# झेडपी कर्मचाऱ्यांच्या बदल्याची प्रक्रिया सुरू

युवावार्ता (प्रतिनिधी)



अहिल्यानगर - राज्य शासनाने जिल्हा परीषदेच्या 'क' व 'ड' वर्ग कर्मचाऱ्यांच्या बदल्याचे सुधारीत धोरण निश्चित केले आहे. या बदल्यांमधून शिक्षक संवर्ग वगळण्यात आला आहे. त्यानुसार २०२६ मध्ये सर्वसाधारण बदल्या शासनाने ठरवून दिलेल्या वेळापत्रकानुसार होणार आहे. ६ एप्रिलपासून ही प्रक्रिया सुरू करण्यात आली असून ४ मे रोजी अंतिम वास्तव्य ज्येष्ठता यादी प्रसिध्द करण्यात येणार असल्याचे परिपत्रक मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांनी सोमवारी (६ एप्रिल) काढले आहे.

६ ते १० एप्रिलपर्यंत प्रशासकीय व विनंती बदली अर्ज सादर करणे, १३ एप्रिल रोजी सायंकाळी पाच वाजेपर्यंत अर्जानुसार बदल्याची माहिती एकत्रित करून त्या-त्या विभागाकडे सादर करणे, १७ एप्रिल रोजी संवर्गनिहाय कर्मचारी तात्पुरती प्रारूप वास्तव्य ज्येष्ठता याद्या प्रसिध्द करणे, २४ एप्रिल रोजी सायंकाळी पाच वाजेपर्यंत हरकती नोदविणे, २७ एप्रिल रोजी हरकतींची पडताळणी करणे व ४ मे रोजी सायंकाळी पाच वाजेपर्यंत अंतिम वास्तव्य ज्येष्ठता यादी प्रसिध्द करणे असे वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. प्रशासकीय व विंनती बदल्यातून सुट किंवा प्राधान्य क्रमात मोडणारे सर्व संबंधित कर्मचारी यांच्या बाबतीत त्यांनी सादर केलेले पुराव्यांची कार्यालय प्रमुखांनी पडताळणी करणे. या बदल्या दरम्यान कोणतीही चुक किंवा अनियमितता होणार नाही याची काळजी खातेप्रमुखांनी द्यावी असे स्पष्ट आदेश मुख्य कार्यकारी अधिकारी भंडारी यांनी दिले आहेत.

# आरोग्य हाच खरा संपत्तीचा खजिना

## 7 एप्रिल जागतिक आरोग्य दिन

**निरोगी शरीर ;शांत मन.**
**यातच दडलं जीवनाचे धन.**
**आरोग्याचा करूया सन्मान.**
**हाच खरा जीवनाचा अभिमान.**


७ एप्रिल हा दिवस दरवर्षी जागतिक आरोग्य दिन म्हणून साजरा केला जातो. या दिवसाचे विशेष महत्त्व म्हणजे संपूर्ण जगभरातील लोकांमध्ये आरोग्य विषयी जागृती निर्माण करणे होय. १९४८ साली जागतिक आरोग्य संघटना (थकज) ची स्थापना झाली. आणि त्याच निमित्ताने ७ एप्रिल हा दिवस आरोग्य दिन म्हणून घोषित करण्यात आला.

आरोग्य म्हणजे केवळ आजार नसणे नव्हे; तर शारीरिक; मानसिक आणि सामाजिक दृष्ट्या पूर्णपणे निरोगी असणे होय. आजच्या धावपळीच्या जीवनात लोक आपल्या आरोग्याकडे दुर्लक्ष करतात. अनियमित आहार; व्यायामाचा अभाव; ताण तणाव आणि झोपेची कमतरता यामुळे अनेक आजार वाढताना दिसतात. त्यामुळे आरोग्याची काळजी घेणे अत्यंत आवश्यक झाले आहे.

जागतिक आरोग्य दिन दरवर्षी एका विशिष्ट विषयावर आधारित असतो. यामधील मानसिक आरोग्य; मातृ -शिशु आरोग्य; पर्यावरण आणि आरोग्य; संसर्गजन्य आजार यांसारख्या विषयावर भर दिला जातो. त्यामुळे लोकांना आरोग्याच्या विविध पैलूंची माहिती मिळते.आणि ते अधिक सजग होतात.

आरोग्य चांगले ठेवण्यासाठी संतुलित आहार; नियमित व्यायाम; पुरेशी झोप आणि सकारात्मक विचारसरणी आवश्यक आहे. तसेच स्वच्छता राखणे ;वेळेवर लसीकरण करणे ;आणि डॉक्टरांचा सल्ला घेणे तितकेच महत्त्वाचे आहे.आरोग्य हेच खरे धन आहे हे तत्व आपण जीवनात नेहमी ऐकतो आणि ते खरोखरच आपल्या जीवनात लागू होते..

स्वतःच्या आरोग्याबरोबर समाजाच्या आरोग्याची ही जबाबदारी घेतली पाहिजे. स्वच्छता; निरोगी सवयी आणि आरोग्य बाबत जागरूकता पसरवणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. आजच्या आधुनिक युगातही या दिवसाचे महत्त्व कमी झालेले नाही. आपल्याला सत्य; अहिंसा आणि एकता यांचा मार्ग अनुसरण्याची प्रेरणा या दिवसातून मिळते. समाजात शांतता आणि सहकार्य टिकवण्यासाठी हा दिवस मार्गदर्शक ठरतो. आजची तरुण पिढी देशाची ताकद आहे. या दिवसाच्या इतिहासातून त्यांना संघर्ष; जिद्द आणि धैर्य यांचे धडे मिळतात. संकटांना न घाबरता योग्य गोष्टीसाठी उभे राहणे हीच खरी शिकवण आहे.. अशा या ऐतिहासिक दिवसांनी आपल्याला एक मोठा संदेश दिला आहे. अन्याय विरुद्ध आवाज उठवणे आणि सत्याच्या मार्गावर चालणे खरे कर्तव्य आहे.





आपणही या मूल्यांचे पालन करून अधिक चांगलं करण्यासाठी प्रयत्न करणे अतिशय गरजेचे आहे. सध्याच्या या स्पर्धेच्या आणि धावपळीच्या युगामध्ये मानवाला आपल्या स्वतःच्या आरोग्याकडे लक्ष देण्यास पुरेसा वेळ मिळत नाही. रात्रंदिवस काबड कष्ट करण्यासाठी मानव हा धावत असतो. वेळे अभावी जेवण देखील वेळेवर न केल्यामुळे बाहेरील उघड्यावरील पदार्थ खाल्ल्याशिवाय त्याच्यापुढे पर्याय उभा राहत नाही. शेवटी नावीला जास्तव बाहेरील उघड्यावरील पदार्थ खाल्ल्याशिवाय पर्याय उरत नाही .आणि मग स्वतःच्या तब्येतीची नासाडी होत असते.. म्हणून मानवाने वेळात वेळ काढून नेहमी आपल्या आरोग्याची काळजी घेणे अतिशय क्रम प्राप्त आहे. वेळेवर पुरेसे जेवण. पुरेशी झोप या गोष्टी शरीराला अतिशय अत्यावश्यक आहे..म्हणून वेळात वेळ काढून मानवाने आपल्या आरोग्याची काळजी घेणे अतिशय क्रम प्राप्त झाले आहे. कितीही संपत्ती कमवली तरी ती इथेच राहणार आहे. आरोग्याची काळजी घेणे हे क्रम प्राप्त आहे

म्हणून मला या ठिकाणी असे म्हणावेसे वाटते की, संसार केला कोट्यान कोटी ;पण मेल्यावर मात्र संग येईना लंगोटी अशी आपली अवस्था होऊ नये ही माझी प्रामाणिक इच्छाआहे

**शेवटी मी असेही म्हणेल की**
**वेळेवर खाणं; वेळेवर झोप**
**आरोग्यासाठी हाच उत्तम उपाय;**
**वाईट सवयींना करू दूर.**
**निरोगी राहणे हेच खरे सूर**

**प्रा. ज्ञानेश्वर कृष्णाजी बनसोडे**
**(पोलीस क्राईम न्यूज ब्युरो चीफ)**
**साकुरी, ता. रहाता, जि. अहिल्यानगर**
**मो. ९६०४७९७३१६**

# जनगणनेच्या कामात भाग न घेणाऱ्या 10 जणांवर फौजदारी गुन्हा दाखल




नागपूर (वृत्तसंस्था)

देशभरात १ एप्रिलपासून जनगणना २०२६-२७ च्या कामाला सुरुवात झाली असताना नागपूरमध्ये या कामाकडे दुर्लक्ष करणाऱ्यांविरोधात महापालिकेने कडक पाऊल उचलले आहे. जनगणना प्रक्रियेत सहभागी होण्यास टाळाटाळ करणाऱ्या तब्बल १० जणांविरोधात नागपूर महानगरपालिकेने गुन्हा दाखल केला आहे.

महानगरपालिकेच्या सतरंजीपुरा झोनमधील सहाय्यक आयुक्तांनी यासंदर्भात तक्रार दाखल केल्यानंतर यशोधरा नगर पोलिस ठाण्यात एफआयआर नोंदवण्यात आला. जनगणना प्रक्रियेसाठी देण्यात आलेले आदेश न पाळणे आणि कर्तव्यात हलगर्जीपणा केल्याचा ठपका या संबंधितांवर ठेवण्यात आला आहे.

नागपूर महापालिकेने या प्रकरणात गुन्हा दाखल केला आहे. या कारवाईत एक प्राचार्य, चार शिक्षक, एक मुख्याध्यापक अशा एकूण १० शैक्षणिक कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. राष्ट्रीय कर्तव्य मानल्या जाणाऱ्या जनगणना प्रक्रियेत सहभाग टाळल्यामुळे ही कठोर कारवाई करण्यात आली आहे.

महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, संबंधित कर्मचाऱ्यांनी जनगणना कामासाठी पर्यवेक्षक आणि प्रगणक म्हणून नेमणूक आदेश स्वीकारण्यास टाळाटाळ केली. त्यामुळे प्रशासनाने याला गंभीर बाब मानत थेट फौजदारी कारवाईचा मार्ग अवलंबला आहे. महानगरपालिकेने स्पष्ट इशारा दिला आहे की, जनगणना हे अत्यंत महत्त्वाचे राष्ट्रीय कर्तव्य असून त्याकडे दुर्लक्ष करणाऱ्यांवर यापुढेही अशाच प्रकारे कडक कारवाई केली जाईल. आवश्यकतेनुसार आणखीही गुन्हे दाखल होऊ शकतात, असा इशाराही महापालिका प्रशासनाने दिला आहे.

# राज्यात पेट्रोलियम पदार्थांचा पुरेसा साठा

## अन्न नागरी पुरवठा अपर मुख्य सचिव अनिल डिग्गीकर यांची माहिती



मुंबई (वृत्तसंस्था)

राज्यात पीएनजी जोडण्यांची संख्या २५.३६ लाखांवर पोहोचली असून एका महिन्यात ७३ हजार नवीन जोडण्या देण्यात आल्या आहेत. सीजीडी पाईपलाईनसाठी **"Deemed Permission'** देण्याचा निर्णय घेतल्याने नेटवर्क विस्ताराला गती मिळणार आहे. ज्या ठिकाणी पीएनजी नेटवर्क पोहोचलेले आहे त्याठिकाणी ग्राहकांनी त्यासाठी नोंदणी करणे आवश्यक आहे. ज्या भागांमध्ये पीएनजी पाईपलाईन टाकणे शक्य नाही त्या ठिकाणी एलपीजीचा पुरवठा पूर्ववत सुरू राहणार असून महाराष्ट्रात एलपीजी, पेट्रोल आणि डिझेलचा पुरवठा सुरळीत सुरू असल्याची माहिती अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव अनिल डिग्गीकर यांनी दिली.मंत्रालयात आयोजित पत्रकार परिषदेत अपर मुख्य सचिव डिग्गीकर यांनी ही माहिती दिली. यावेळी शिधा नियंत्रक चंद्रकांत डांगे, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह, 'पीआयबी'च्या महासंचालक स्मिता वत्स-शर्मा, तेल उत्पादक राज्य समन्वयक उमेश कुलकर्णी, भारत पेट्रोलियम कार्पोरेशन, कृषी संचालक सुनिल बोरकर यांच्यासह संबंधित उपस्थित होते.

मध्यपूर्वेतील सध्याच्या भू-राजकीय तणावामुळे पेट्रोलियम पदार्थांच्या पुरवठा साखळीवर काही प्रमाणात दबाव निर्माण झाला असला, तरी राज्यातील पुरवठा सुरळीत असल्याचे सांगून अपर मुख्य सचिव डिग्गीकर म्हणाले की, जिथे जिथे शक्य आहे तिथे पीएनजीचा वापर वाढवण्यात येणार आहे.

ज्या ठिकाणी पाईप लाईन गॅस पुरवठा शक्य आहे. त्या ठिकाणी ३० जून पर्यंत पीएनजी बंधनकारक असून ज्या भागांमध्ये पीएनजी पाईपलाईन टाकणे शक्य नाही त्या ठिकाणा एलपीजीचा पुरवठा पूर्ववत सुरू राहणार आहे. पीएनजी कनेक्शन ज्या भागांमध्ये उपलब्ध तिथे त्याचा वापर वाढवायचा असून ग्राहकांच्या दृष्टीने विचार करता पीएनजी स्वस्त असून त्याचे देशांतर्गत उत्पादन जास्त आहे. पीएनजी नेटवर्क जिथे पोहोचले आहे तिथे तिथे ग्राहकांनी नोंदणी केली पाहिजे असे अपर मुख्य सचिव डिग्गीकर यांनी यावेळी सांगितले.

पॅनल देणे आहे

सणांचा आनंद आणि बचतीची सुवर्णसंधी घेऊन येत आहे
ओम महाले अँड ग्रुप प्रस्तुत
पोपट भगीरथ महाले ज्वेलर्स!
PBM Jeweller's
अशोक चौक, चावडीजवळ, संगमनेर, जि. अ. नगर
१ तारखेपासून सुरू – फ्री GST स्कीम
होळीच्या शुभमुहूर्तावर सुरू होणारी ही खास ऑफर थेट रमजान ईदपर्यंत – संपूर्ण एक महिना!
- संपर्क - 7599996999 8265036807
लग्नकार्य, वाढदिवस किंवा खास गिफ्टसाठी हीच योग्य वेळ!
या कालावधीत सोनं, चांदी आणि आकर्षक दागिन्यांची खरेदी करा आणि मिळवा GST पूर्णपणे फ्री!
विश्वास, गुणवत्ता आणि शुद्धतेची खात्री पोपट भगीरथ महाले ज्वेलर्स!
मर्यादित कालावधीची ऑफर
आजच भेट द्या आणि बचतीचा सुवर्णयोग साधा!


पॅनल देणे आहे





नोकरीची सुवर्णसंधी
CONTACT : 98223 43319
सेल्समन ...................... 05
सेल्सगर्ल...................... 05
कॉम्प्युटर ऑपरेटर.... 02
हेल्पर........................ 03
We are HIRING!
भंडारी
We are HIRING!
मेनरोड कॉर्नर, संगमनेर


# शिबलापूरमध्ये पाणीटंचाईचा उद्रेक

## दलित वस्तीतील महिलांचा ग्रामपंचायतीवर हांडा मोर्चा



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- संगमनेर तालुक्यातील शिबलापूर गावातील दलित वस्तीमध्ये गेल्या दोन महिन्यांपासून तीव्र पाणीटंचाई निर्माण झाली असून, यामुळे संतप्त झालेल्या महिलांनी ग्रामपंचायतीवर हांडा मोर्चा काढत जोरदार आंदोलन केले. वारंवार तक्रारी करूनही पाणीपुरवठा सुरळीत होत नसल्याने नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित वस्तीत दर चार ते पाच दिवसांनी केवळ काही वेळासाठीच पाणीपुरवठा केला जात आहे. या अपुऱ्या पाण्यामुळे पिण्याची तसेच दैनंदिन वापराची गरजही भागत नसल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. विशेषतः महिला वर्गाला पाण्यासाठी मोठी धावपळ करावी लागत असून, त्यांच्या दैनंदिन जीवनावर त्याचा गंभीर परिणाम होत आहे.

या पार्श्वभूमीवर संतप्त महिलांनी हातात हांडे घेऊन ग्रामपंचायतीवर मोर्चा काढला. जोपर्यंत नियमित पाणी मिळत नाही, तोपर्यंत येथून हलणार नाही, अन्यथा ग्रामपंचायतीला कुलूप लावू, असा इशारा त्यांनी यावेळी दिला. आंदोलनादरम्यान ग्रामसेवकांशी चर्चा करण्यात आली असून, दोन दिवसांत पाणीपुरवठा सुरळीत करण्याचे आश्वासन देण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.

दरम्यान, सामाजिक कार्यकर्ते संजय मंतोडे यांनीही प्रशासनाला इशारा देत सांगितले की, ठराविक कालावधीत पाणीपुरवठा नियमित न झाल्यास सर्व समाजाला एकत्र घेऊन तीव्र आंदोलन छेडण्यात येईल. त्यामुळे शिबलापूरमधील पाणी प्रश्न आता अधिकच गंभीर बनला असून, प्रशासन या परिस्थितीकडे तातडीने लक्ष देणार का, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

एकीकडे ग्रामीण भागात मूलभूत सुविधांसाठी संघर्ष करावा लागत असताना, शिबलापूरमधील ही परिस्थिती प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी ठरत आहे. नागरिकांच्या सुरक्षेसाठी व मूलभूत गरजांसाठी आवश्यक असलेला पाणीपुरवठा तातडीने सुरळीत करणे गरजेचे असल्याचे मत व्यक्त होत आहे.

आधीच बाहेर उन्हाच्या झळा त्यात पाण्याचा दुष्काळ यामुळे महिलांना कामधाम सोडून पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे.

# पालकमंत्र्यांच्या सहकार्याने संगमनेरात ४७ हायमॅक्स

## पायाभूत सुविधांना महायुतीचे प्राधान्य - आ. खताळ



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर शहरातील प्रभागांकरीता पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या सहकार्याने जिल्हा नियोजन व विकास समितीमधून सुमारे २कोटी रुपयाच्या निधीचे ४७ सौर उर्जेवरील हाय मॅक्स दिवे मंजूर करण्यात झाले आहेत. त्यापैकी १४ हायमॅक्स दिव्यांचे काम पूर्ण झाले असून भाजपाच्या स्थापना दिनाच्या निमिताने हायमॅक्सचे लोकार्पण आ.अमोल खताळ आणि महायुतीच्या पदाधिकार्यांच्या उपस्थितीत करण्यात आले.

जनतानगर मधील जिजामाता गार्डन आणि लालतारा हाउसिंग सोसायटी येथील हायमॅक्स दिव्यांचे प्रातिनिधीक स्वरुपात लोकार्पण करण्यात आले. संगमनेर विधानसभा मतदार संघात पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील आणि आ. अमोल खताळ यांच्या माध्यमातून जिल्हा नियोजनमधून २०० सौर ऊर्जेवर चालणाऱ्या ऑटोमॅटिक हायमॅक्स दिव्यांना मंजुरी मिळालेली आहे यातील शंभर हाय मॅक्स दिवे बसून पूर्ण झाले आहेत उर्वरित हायमॅक्स दिव्यांचे काम प्रगतीपथावर सुरू आहे. या हायमॅक्स दिव्यांमुळे परिसरातील नागरिकांना मोठा सुरक्षेच्या दृष्टीने मोठा दिलासा मिळाला आहे.विशेष म्हणजे हायमॅक्स पूर्णपणे सौर उर्जेवर असल्याने वीजबीलाचा कोणताही भार स्थानिक संस्थेवर येणार नाही.संध्याकाळी सात वाजता आपोआप दिवे सुरू होतात.त्यामुळे वीज वितरण कंपनीचा वीज पुरवठा खंडीत झाला तरी सौरऊर्जेवरील दिव्यांची सुविधा नागरीकांना मिळणार आहे. लोकार्पण सोहळ्यास मुख्याधिकारी दयानंद गोरे, नगरसेविका साक्षी सूर्यवंशी,शिवसेना शहराध्यक्ष विनोद सूर्यवंशी, भाजप शहराध्यक्ष पायल ताजणे, भाजप सरचिटणीस भारत गवळी, आर पी आय शहराध्यक्ष कैलास कासार, राजू गायकवाड, सौ. संगिता गवळी, राहुल म्हस्के, फुलचंद गांधी, सुरेश गवळी, शिवाजी अंभंग, वैभव आंडगळे, हौसाबाई आंडगळे, मच्छिंद्र वाबळे, दिलीप रावल, शोभा घुले, सुलोचना गायकवाड, राहुल भोईर, शशांक नामन, वरद बागुल, सागर भोईर यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

याप्रसंगी बोलताना आ.अमोल खताळ म्हणाले की, शहराच्या विकासाला महायुती सरकारच्या माध्यमातून निधी उपलब्ध होत आहे.शहराच्या विकासाला निधीची कमरता भासू दिली जाणार नाही. नागरीकांच्या मुलभूत सुविधांना आमचा प्राधान्यक्रम असून, शहरातील रस्त्यांच्या दुरुस्ती साठी उपमुख्यमंत्री व नगरविकासमंत्री एकनाथ शिंदे यांच्या माध्यमातून ५० लाख रुपये मंजूर होऊन वर्ग झाले आहेत.

नमो गार्डन सुद्धा मंजूर झाले आहेत संगमनेर शहरातील जनतेच्या पाठीमागे महायुती सरकार भक्कम उभे आहे संगमनेर नगरपालिके मध्ये शिवसेना महायुतीचा नगरसेवक एक असला तरी इतर सर्व पदाधिकारी कार्यकर्ते जनसेवक म्हणून काम करतील आणि शहरातील नागरिकांच्या अडीअडचणी सोडवतील आशी ग्वाही आ. अमोल खताळ यांनी दिली.


INVOFIX
आजच सोलर सिस्टीम लावा व आपले लाईट बिल शुन्य करा
शासनामार्फत मिळणारी सबसिडी
1KW 30,000/- Rupees
2KW 60,000/- Rupees
3KW 78,000/- Rupees
सौर उर्जा आजची गरज.. उद्याची बचत..
उपलब्ध सुविधा
१. बँक लोन सुविधा उपलब्ध
२. विज बिल शुन्य करा
३. मोफत मार्गदर्शन
४. फ्री साईट व्हिजीट
५. एक्स्पर्ट टिम, क्वालिटी वर्क
PM SURYA GHAR
आजच योजनेचा लवकरात लवकर लाभ घ्या व भरघोस सबसिडी मिळवा.
Invofix Solution Pvt. Ltd., स्वागत मंगल कार्यालया समोर, अकोले बायपास रोड, संगमनेर ४२२६०५, जि. अहिल्यानगर.
7030334486
7030334494

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का?
काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
SMBT BANK
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
✻ कर्ज रक्कम वाढ । ✻ कर्ज व्याजदर कमी । ✻ कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु॥, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता


## युवा न्यूज डिजिटल वाचक प्रतिसाद

दैनिक युवावार्ता परिवर्तनाचा पुरस्कर्ता

युवा न्यूज डिजिटल क्षेत्रात कार्यरत असताना अनेक व्हिडिओंना एक लाखाच्या पुढून व्हूज मिळालेले आहेत. अत्यंत गंभीर घटनांच्या संदर्भातील व्हिडिओंना वाचकांचा उत्कृष्ट प्रतिसाद मिळत असताना दैनिक युवावार्ताद्वारे डिजिटल युवा प्रतिसाद माहिती वाचकांना देत आहोत. वाचकांनी आपले अभिप्राय कळविण्याची विनंती.

संगमनेरात वारंवार कारवाई होऊन ही कत्तलखाने सुरूच आहेत. पुन्हा एकदा या कत्तलखान्यांवर कारवाई झाली. त्यासंदर्भातील व्हिडिओ वाचकांच्या माहितीसाठी युवा न्यूज द्वारे QR कोड देत आहोत.


चैतन्य हॉस्पिटल
• अतिदक्षता विभाग
• मधुमेह व हृदयरोग
• दमा व श्वसनाचे विकार
• फुफ्फुसासंबंधी औषधोपचार
• जनरल सर्जरी
• पोटाचे विकार व शस्त्रक्रिया
• किडनी विकार
• मेंदू विकार व शस्त्रक्रिया
• सर्पदंश व विषबाधा
• बालरोग चिकित्सा विभाग
• प्लास्टिक सर्जरी व व्यंगोपचार
• संधीवात व मणके विकार
आपत्कालीन औषधे व उपचार
सर्व कंपनीजच्या कॅशलेस सुविधा उपलब्ध
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
०२४२५ - २२४७६२, मोबा. ७०३८२७०३८२

अविवाहितांच्या, नवविवाहितांच्या, चाळीशीनंतरच्या स्त्री-पुरूषांच्या तसेच मधुमेही व व्यसनाधिनांच्या
सेक्स समस्या
हस्तमैथुनाचे दुष्परिणाम/स्वप्नदोष/धातुपात
शीघ्रपतन/असमाधान/कमजोरी/ शुक्राणुंची कमी
गुप्तरोग/ त्वचारोग/ नपुंसकत्व/ मानसिक नैराश्य
जर्मनमेड होमिओपॅथिक औषधे-शास्त्रोक्त मार्गदर्शन
डॉ. अभय मुथा (मनोलैंगिक विकार तज्ञ)
B.H.M.S., M.D.(A.M), M.D.(Acu)., P.G.(SEXOLOGY)
३० वर्षांचा प्रदीर्घ अनुभव (राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त)
अत्याधुनिक मशिनच्या सहाय्याने तपासणी करून औषधोपचार
(प्रत्येक नवीन रूग्णासाठी १ तास वेळ दिला जातो) ऑपॉईंटमेंट आवश्यक
१ लाखांहून अधिक रूग्णांवर यशस्वी उपचार
ISO मानांकन प्राप्त
सेक्स सुपर स्पेशालिटी होमिओपॅथिक क्लिनिक
विनायकनगर, नगर-पुणे रोड, अहिल्यानगर
www.sextreatment.in
94 22 23 90 13

दर्शन टेक्सटाईल मार्केट
मान्सून ऑफर
30% ते 70% डिस्काउंट सेल
सेले नव्हे होलसेल सेल
संपर्क : 8390005001
जाणता राजा मार्ग, आय.डी.बी.आय बँक समोर, संगमनेर - 422605

कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
स्वास्थ्य रक्षणाय रोग परिशमनाय
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist
डॉ. निखील रहांगडाले Orthosurgeon
डॉ. सुनिल दिघे Cardiologist
डॉ. फैमुद्दीन शेख Medicine
• सर्जरी विभाग • डायलिसीस विभाग • हृदयरोग विभाग • जॉईंट रिप्लेसमेंट
• अतिदक्षता विभाग • सुपर स्पेशालिटी विभाग • मेडिसीन विभाग • स्पाईन सर्जरी
• अपघात विभाग • न्यूरोविभाग • अद्ययावत कॅथलॅब • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा
पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना
ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
(०२४२५) २२६६८८, २२६६८६



दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर–४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25